**सुविचार**
जब हम क्रोध की अग्नि में जलते हैं तो इसका धुआँ हमारी ही आँखों में जाता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२०२ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## १५ लाख कोटींहून अधिक किंमतीच्या प्रकल्पांचे काम सुरु

अहमदाबाद : अनेकांनी माझी खिल्ली उडवली, पण मी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भूमीत जन्मलेला मुलगा आहे. गप्प राहून देशहिताची धोरणे बनवण्यात मग्न होते. मी भाग्यवान आहे की तुम्ही मला आशीर्वाद देण्यासाठी इतक्या मोठ्या संख्येने आलात. तुमच्या अपेक्षांचीही मला जाणीव आहे. तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर मी लवकरात लवकर तुमच्यामध्ये यावे अशी तुमची इच्छा होती. देशातील जनतेने नवा इतिहास रचला आहे. एका सरकारला सलग तिसऱ्यांदा देशसेवेची संधी मिळाली असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

गुजरात दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान मोदी यांनी अहमदाबादच्या मैदानावर आयोजित केलेल्या भव्य स्वागत समारंभाला हजेरी लावली. येथे ते म्हणाले की, तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर मी पहिल्यांदाच गुजरातमध्ये आलो आहे. तुम्ही लोकांनी माझ्यावर सतत प्रेमाचा वर्षाव केला आहे. मुलगा घरी येऊन आशीर्वाद घेतो तेव्हा उत्साह अनेक पटींनी वाढतो.



१५ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प १०० दिवसांत सुरू झाले

लोक मोदींबद्दल सर्व प्रकारचे बोलत राहिले. मी पण ठरवले होते की, तुम्हाला पाहिजे तेवढी मजा करा, मी एक शब्दही बोलणार नाही. प्रत्येक अपमान सहन करून मी धोरणे बनवण्यात आणि देशातील जनतेच्या हिताचे निर्णय घेण्यात व्यस्त राहिलो. देशाच्या कल्याणासाठी जो मार्ग मला अवलंबायचा आहे, त्यापासून मी हटणार नाही, असे मी ठरवले होते. आज आम्ही आनंदी आहोत की हे सर्व अपमान दूर करून, या १०० दिवसांत समाजातील प्रत्येक घटकाच्या कल्याणाची हमी दिली गेली आहे. या १०० दिवसांत १५ लाख कोटींहून अधिक किमतीच्या अनेक प्रकल्पांवर काम सुरू झाले आहे. यात पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य सेवा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, ऊर्जा, सुरक्षा, रस्ते, रेल्वे, बंदरे इत्यादींवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. निवडणुकीच्या वेळी मी ३ कोटी घरे बांधण्याची हमी दिली होती. त्यांचे कामही सुरू झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण झाले आहेत. कोल्हापूर- पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी ६ वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेंना हिरवा झेंडा दाखवला. यात नागपूर ते सिकंदराबाद, कोल्हापूर ते पुणे, आग्रा कॅंट ते बनारस, दुर्ग ते विशाखापट्टणम, पुणे ते हुबळी आणि वाराणसी ते दिल्ली पहिल्या २० डब्यांच्या वंदे भारत रेल्वेचा त्यात समावेश आहे. पंतप्रधान मोदींनी भूज ते अहमदाबाद पहिल्या वंदे मेट्रोलाही हिरवा झेंडा दाखवला.

कोल्हापूर- पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा यावेळी शुभारंभ झाला. सव्वाचार वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधून ऑनलाईन पद्धतीने तर रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा प्रत्यक्ष उपस्थित राहून कोल्हापूर स्थानकातून या गाडीला हिरवा झेंडा दाखवला. कोल्हापूर - पुणे वंदे भारत आठवड्यातून दर सोमवार, गुरुवार आणि शनिवारी तर पुणे-कोल्हापूर या मार्गावर दर बुधवार, शुक्रवार आणि रविवारी धावणार आहे. याचवेळी

(पान ५ वर )

## दहशतवाद जमिनीत गाडून टाकू- अमित शाह

किश्तवाड : जम्मू-काश्मिरातील विरोधी पक्ष हे कुटुंब केंद्रीत राजकारण करणारे आहेत. स्वतःच्या फायद्यासाठी त्यांना राज्यात दहशतवाद वाढवायचा आहे. परंतु, भाजपा सरकार सत्तेत आल्यास दहशतवाद जमिनीत गाडून टाकू असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड येथे सोमवारी आयोजित सभेत ते बोलत होते. सभेला संबोधित करताना अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर जोरदार टीकास्त्र सोडले. नॅशनल कॉन्फरन्स आणि कॉंग्रेसवर आपल्या कुटुंबाचे सरकार बनवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. तसेच, नॅशनल कॉन्फरन्स आणि कॉंग्रेस जम्मू-काश्मीरमध्ये सत्तेवर येऊ शकत नसल्याचे शाह म्हणाले.



याशिवाय, ओमर अब्दुल्ला आणि राहुल गांधी यांना राज्यात पुन्हा एकदा दहशतवाद वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र भाजप सरकार दहशतवाद जमिनीत गाडून टाकेल असे शाह यांनी सांगितले.

कॉंग्रेस आणि त्यांचे नेते राहुल गांधी यांना जम्मू-काश्मीरला पुन्हा दहशतवादाकडे ढकलायचे आहे, असे सांगत अमित शाह म्हणाले की, कॉंग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सचे सरकार आले तर दहशतवाद सुरू होईल. मी तुम्हाला वचन देतो. आम्ही दहशतवादाला गाडून टाकू. आम्ही दहशतवादाला अशा स्तरावर गाडून टाकण्याचा संकल्प केला आहे की, तो परत येऊ शकत नाही. याशिवाय, जम्मू-काश्मीरमधील निवडणुकीचे वातावरण पाहत असल्याचे सांगत ना अब्दुल्लांचं सरकार बनतंय ना राहुल गांधींचं सरकार. यावेळी खोऱ्यात भाजपाच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होईल, असा दावा अमित शाह यांनी केला.

## रेशनसाठी आता ई-केवायसी आवश्यक

नवी दिल्ली : देशातील नागरिकांसाठी केंद्र सरकार अनेक योजना राबवत आहे. देशातील अनेक लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. ज्यामध्ये बहुतांश गरीब गरजू लोकांचा समावेश आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत गरीब गरजू लोकांना अत्यंत कमी दरात रेशन मिळते. दरम्यान, आता केंद्र सरकारने शिधापत्रिका धारकांसाठी नवीन नियमावली लागू केली असून, शिधापत्रिकेची ई-केवायसी केली नाही, तर १ नोव्हेंबरपासून रेशन बंद होणार आहे.

कमी किमतीच्या रेशन योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे शिधापत्रिका असणे खूप आवश्यक आहे. आता सरकारने शिधापत्रिकाधारकांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार १ नोव्हेंबरपासून रेशन बंद होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती अन्न आणि सार्वजनिक मंत्रालयाने यापूर्वीच जारी केली होती. मात्र अनेक शिधापत्रिकाधारकांची अवस्था अशीच आहे. ज्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यांचे रेशन १ नोव्हेंबरपासून बंद होणार आहे. विभागाने दिलेल्या माहितीनुसार ई-केवायसीसाठी ३१ ऑक्टोबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

शिधापत्रिकाधारकाने ३१ ऑक्टोबरपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्याला पुढचा महिना रेशन मिळणार नाही. अशा शिधापत्रिकाधारकांची नावेही शिधापत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. ई-केवायसी नसलेल्या शिधापत्रिका रद्द केल्या जातील. यानंतर या लोकांना सरकारच्या रेशन योजनेचा लाभ मिळणार नाही, असे स्पष्ट सूचित करण्यात आले आहे.

हयात नसलेल्यांची नावे वगळली जाणार

रेशनकार्डवर बरीच नावे अशी आहेत, जे हयात नाहीत. त्यामुळे ती नावे वगळली जाणार आहेत. त्यामुळे आता सर्व शिधापत्रिकाधारक म्हणजेच कुटुंबाच्या शिधापत्रिकेत ज्यांची नावे नोंदलेली आहेत, या सर्वांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. त्यासाठी ते त्याच्या जवळच्या अन्न पुरवठा विभागाच्या कार्यालयात जाऊ शकतात. कोणत्याही सदस्याने ई-केवायसी न केल्यास त्याचे नाव शिधापत्रिकेतून काढून टाकले जाणार आहे.

## आता पर्यंत ऊसाला योग्य भाव देण्याचा विठ्ठलसाई प्रयत्न राहिला आहे: बसवराज पाटील

उमरगा : साखर उद्योगाला निसर्गाची साथ महत्वाची आहे. मागील वर्षी अत्यल्प पाऊस होता आणि या वर्षीही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. परिणाम कार्यक्षेत्रात ऊसाच्या क्षेत्रात ५० टक्के घट झाली आहे.

आता परतीच्या पावसाची प्रतिक्षा आहे. परिपक्व होण्यापूर्वी ऊस तोडला तर ऊसाची वाढ पूर्ण झाली नसल्याने ऊसाचे वजनात घट होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होईल व कारखान्याला साखर उतारा कमी मिळाल्याने कारखान्याचा तोटा होईल. दुहेरी तोटा होऊ नये यासाठी परिपक्व ऊस गाळपास पाठवणे आवश्यक आहे. आजपर्यंत ऊसाला सातत्याने योग्य दर देण्यास प्राधान्य देण्यात आल्याचे मत चेअरमन बसवराज पाटील यांनी व्यक्त केले. श्री विठ्ठलाची सहकारी साखर कारखान्याची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याचे



चेअरमन बसवराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१६) दुपारी कारखाना कार्यस्थळावर खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली, यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर काशी,श्रीशैल्यमव उजैन पिठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील, कारखान्याचे संचालक केशव पवार, विश्वनाथ पत्रिके, ॲड. सुभाष राजोळे, विठ्ठलराव पाटील, शब्बीर जमादार, संगमेश्वर घाळे, राजीव हेबळे, शिवमुर्ती भांडेकर, शिवलिंग माळी, ॲड. विरसंगप्पा आळंगे, ॲड. संजय बिराजदार, दिलीप पाटील, दिलीप भालेराव, मंगलताई गरड, इरम्माताई स्वामी, जिपचे माजी सभापती दत्ता पाटील, प्रकाश आष्टे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, गुंडु भुजबळ, गोविंद पाटील, शंकर पाटील, सतीश पवार, दीपक मुळे, बिलाल काझी, रफिक तांबोळी, सचिन पाटील, प्रल्हाद काळे, महालिंग बाबशेट्टी, भरत मारेकर, रुक्मानंद पवार, मदन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना चेअरमन पाटील म्हणाले की, सहकार ही आपणास मिळालेली संजीवनी आहे. सहकार चळवळ थांबली तर शेतकरी व सर्वसामान्य माणसांवर याचा दूरगामी परिणाम होईल. यामुळे सहकारी चळवळ जिवंत ठेवणे काळाची गरज आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या मालकीचे सहकारी साखर कारखाने कमी होऊन खाजगी कारखानदारी वाढत आहे. सर्व शेतकरी बांधवांनी संपूर्ण ऊस आपल्या हक्काच्या कारखान्याला देऊन सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन पाटील यांनी केले. कारखान्याचे कार्यकारी संचालक एम. बी. अथणी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन, विषय पत्रिकेचे वाचन व अहवाल वाचन केले. केन अकौंटंट राजू पाटील यांनी सुत्रसंचलन तर संचालक विरसिंगप्पा आळंगे यांनी आभार मानले. सभेसाठी सभासद, सर्व खातेप्रमुख, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.



औसा: सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल धाराशिवचे खासदार श्री.ओमराजे निंबाळकर यांनी श्री नाथ संस्थानास भेट देऊन सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज यांचा सत्कार करून दर्शन घेतले, यावेळी माजी आमदार श्री.दिनकरराव माने, श्री.संतोष सोमवंशी, ह.भ.प. श्री.श्रीरंग महाराज औसेकर व ईतर मान्यवर उपस्थित होते, यावेळी सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज यांनी खासदार श्री.ओमराजे निंबाळकर यांचा संस्थानच्या वतिने शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मुर्ती देऊन शुभाशिर्वाद दिले.

## दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्रीपदाच्या नावावर सस्पेन्स

नवी दिल्ली: दिल्लीतील पुढील मुख्यमंत्री कोण असणार आहे यावर सस्पेन्स वाढला आहे. दरम्यान, मंगळवारी १७ सप्टेंबरला याचे चित्र स्पष्ट होईल. पुढील मुख्यमंत्रीपदाच्या नावावर मोहोर लावण्यासाठी सोमवारी आम आदमी पक्षाच्या पॉलिटिकल अफेयर्स कमिटीची बैठक झाली. या बैठकीनंतर दिल्लीचे मंत्री सौरभ भारद्वाज यांनी सांगितले की पुढील मुख्यमंत्री कोण असेल याची घोषणा उद्या केली जाईल.



मुख्यमंत्री केजरीवालांनी बोलावली होती बैठक

सौरभ भारद्वाज म्हणाले, आज मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी बैठक बोलावली होती. एलजी साहेबांकडून मंगळवार संध्याकाळपर्यंतचा वेळ मिळाला आहे. नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावावर आज चर्चा झाली.काल मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की ते मंगळवारी राजीनामा देतील. आज कॅबिनेट बैठकीत ते उपस्थित हो. नेत्यांशी आणि मंत्र्यांसोबत नव्या मुख्यमंत्रीपाबाबत चर्चा करण्यात आली आणि फीडबॅक घेतला.

मंत्र्यांसोबत झाली वन टू वन मीटिंग (पान ५ वर )



लातूर : शहरातील मलंग गल्लीतील गजराजाची डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी पुजा आरती केली. या भागातील नागरिक कोणत्याही शुभ कामाची सुरुवात गजराजाच्या दर्शनाने करतात. मलंग गल्लीत गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहचला असून वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. याप्रसंगी प्रा. भाग्यश्री कौळखेरे व इतर मान्यवर महिला उपस्थित होत्या.

## २५ सप्टेंबर रोजी राज्यातील शाळा राहणार बंद

पुणे : - आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी यिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत.शिक्षक संचमान्यतेचा १५ मार्च २०२४ चा व कंत्राटी शिक्षक भरतीचा ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा २५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात सुधारीत शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. याला राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. ही अंमलबजावणी सुरू झाल्यास राज्याच्या ग्रामीण भागातील १ लाख ८५ हजार विद्यार्थी आणि २९ हजाराहून अधिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

नवीन धोरणानुसार २० किंवा त्यापेक्षा कमी पट असलेल्या शाळांवर केवळ एकच कायम शिक्षक दिला जाणार असून, त्यासोबत सेवानिवृत्त शिक्षकाची कंत्राटी पदधतीने नेमणूक केली जाणार आहे. यामुळे शिक्षक संघटना चांगल्याच आक्रमक झाल्या आहेत.

शाळा बंद पडण्याची भीती

दरम्यान, नवीन शासन धोरणानुसार २० किंवा त्यापेक्षा कमी पट असलेल्या शाळांवर केवळ एकच कायम शिक्षक दिला जाणार असून त्यासोबत सेवानिवृत्त शिक्षकाची कंत्राटी पदधतीने नेमणूक केली जाणार आहे. (पान ५ वर )



## भ्रष्ट पैशातून मतदार संघ विकत घेण्याचे पाप केले त्या पापाची परतफेड करण्याची आता वेळ आली

**लातूर / प्रतिनिधी-** लातूर ग्रामीण मतदार संघाला मी आई मानतो, विकास कामाच्या माध्यमातून या आईची सेवा करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असून गेल्या विधानसभा निवडणुकीत याच आईचा भ्रष्ट पैशातून सौदा केले असा आरोप आ. श्री. रमेश कराड यांनी केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात, वाडी वस्तीत जाऊन ग्रामस्थांशी चर्चा करावी, त्यांच्या अडी अडचणी, प्रश्न समजून घ्यावेत, शक्य असलेल्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी यासाठी भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी सुरू केलेल्या जनसंवाद दौऱ्यात रविवारी रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा, सांगवी, सिंधगाव, निवाडा आणि शेरा येथे ग्रामस्थांशी संवाद कार्यक्रम झाला. प्रत्येक गावात ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. ठिकठीकाणच्या गावकऱ्यांनी वाजत गाजत फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आ. कराड यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी महिलांची संख्या लक्षणीय होती. याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक (पान ५ वर )

## गौरवी भोसले (देशमुख) यांची वेस्ट इंडीयन शुगर (विस्मा) मिल्स वर संचालक म्हणून निवड

लातूर / प्रतिनिधी- राज्यात खाजगी क्षेत्रातील मराठवाडा व विदर्भात उस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक भाव देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालिका सौ गौरवी अतुल भोसले (देशमुख) यांची राज्यातील १३३ खाजगी साखर कारखान्याची शिखर संस्था असलेल्या वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशीएशन (वीस्मा) पुणे येथील नवीन २०२४ते २०२७ या नूतन कार्यकारणी सन्माननीय संचालिका म्हणून बहुमताने निवड करण्यात आली आहे त्याबद्दल त्यांचे राज्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .



सौ गौरवी भोसले देशमुख ह्या जागृती शुगर इंडस्ट्रीज च्या अध्यक्षा असून या साखर कारखान्याने शेतकऱ्यांच्या जिवनात आर्थिक क्रांती केली आहे लातूर जिल्ह्यातील देवणी,उदगीर, चाकुर, निलंगा, शिरूर अनंतपाळ जळकोट तसेच शेजारी असलेल्या कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्यातील अनेक गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम या जागृती शुगर मुळे झालेले आहे त्यांच्या कार्याची दखल घेऊन वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशीशन (विस्मा) पुणे या कार्यकारिणीवर संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे.

मान्यवरांकडून अभिनंदन वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशीएशन पूणे या संस्थेच्या संचालक मंडळावर निवड झाल्याबद्दल सौ गौरवी अतूलजी भोसले (देशमुख) यांचे राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख,राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख,लातूर ग्रामीणचे आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या सह जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे,रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष सर्जेराव मोरे,विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्रीशैल्य उटगे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शामराव भोसले, मांजरा परिवाराचे माध्यम समन्वयक श्री हरीराम कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

यशवंत धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४
२
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## कृष्णाला बऱ्याच गोष्टी मिळाल्या नाहीत लक्ष्मी देखाव्यातून उभारले चित्र



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – कृष्णाला बऱ्याच गोष्टी मिळाल्या नाहीत. त्याच्या जन्मानंतर तो लगेच आई–वडिलांपासून वेगळा झाला. नंतर नंद–यशोदा भेटले परंतू आयुष्यातून तेही गेले. राधा गेली, गोकुळ गेले, मथुरा गेली त्याच्या आयुष्यात काही ना काही निसटतच गेले. हा देखावा धाराशिव येथे महालक्ष्मी समोर डॉ. कविता शेळकीकर यांनी उभा केला होता. शहरातील अनेकांनी भेट देवून देखाव्याचे कौतुक केले. या देखाव्यात कृष्णाने आयुष्यभर त्याग केला तो पण अगदी आनंदाने. ज्याला कृष्ण समजला त्याच्या आयुष्याचा सोहळा झाला. आयुष्यात काही सोडावं लागलं तरीही खुश कसं राहायचं हे कृष्ण शिकवतो. कुरुक्षेत्रावरच्या कृष्णनीतीपेक्षा या गोष्टी जास्त व्याकुळ करतात. आयुष्यात काही जमलं नाही तरी कृष्ण बनून हातातून निसटलेल्या गोष्टीचा, क्षणांचा, स्वप्नांचा, आठवणींचा सोहळा करता आला पाहिजे. पहिली शिवी दिल्यानंतर मुंडके छाटण्याची शक्ती असून देखील नव्व्याण्णव आणखीन शिव्या ऐकण्याची क्षमता ज्याच्यात आहे तो कृष्ण आहे. सुदर्शन चक्रासारखं शस्त्र असून देखील हातात नेहमी बासरी आहे तो कृष्ण आहे. द्वारकेसारखे वैभव असून देखील सुदामासारखा मित्र आहे तो कृष्ण आहे. मृत्यूच्या फण्यावर उभा राहिलेला असून देखील जो नृत्य करतो तो कृष्ण आहे. सर्व सामर्थ्यवान असून देखील जो सारथी बनला तो कृष्ण आहे. अशा प्रकारच्या देखाव्यातून संदेश देण्यात आला.

# तथागत गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकर यांच्या अस्थिकलश महायात्रेचे पुष्पवृष्टीने जल्लोषात स्वागत

## चौकाचौकात अस्थिकलशांच्या अभिवादनास गर्दी

## युद्ध नको, बुद्ध हवा.... घोषणेने परिसर दणाणला





धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – इंडो एशिया मेता फाउंडेशन भारत, नागेश नगरी अस्थी कलश महायात्रा समिती धाराशिव व जम्बुद्वीप बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलश महायात्रेचे जिल्ह्यात आगमन झाले आहे. या महायत्रेचे स्वागत ठिकठिकाणी मोठ्या जल्लोषात व उत्साही वातावरणात मिरवणूक काढीत दि.१५ सप्टेंबर रोजी करण्यात आले. दरम्यान युद्ध नको, बुद्ध हवा... महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो.... आदींसह विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध व डॉ महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश महायात्रेस दि.१० सप्टेंबर रोजी पुणे येथून झाली आहे. ही महायात्रा तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे आल्यानंतर या यात्रेचे जल्लोष स्वागत करण्यात आले.

या महायात्रेत पूज्य भन्ते रेवात महाथेरो (श्रीलंका), पूज्य भन्ते पलामोधम्मो महाथेरो (व्हिएतनाम), देवमित्ता महाथेरो (श्रीलंका), पुज्य भन्ते प्रियदर्शी महाथेरो (भारत), पुज्य भन्ते होआई व्हू महाथेरो (व्हिएतनाम), पुज्य भन्ते वेलीविठीये महाथेरो (श्रीलंका) व पुज्य भन्ते धम्मसार थेरो (महाराष्ट्र) आदींचा समावेश आहे. ही महायात्रा धाराशिव जिल्ह्यात दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे दाखल झाल्यानंतर या यात्रेचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सुरतगाव, तुळजापूर येथे आगमन व शहरात मिरवणूक काढण्यात आली. तर धाराशिव शहरात दाखल झाल्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण घालून अभिवादन केले. त्यानंतर ही रॅली वाजत गाजत छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात आल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्रिशरण चौक, लेडीज क्लब मार्गे पुष्पक मंगल कार्यालयापर्यंत वाजतगाजत काढण्यात आली. तर पुष्पक मंगल कार्यालयात उपस्थितांना भन्तेजींनी धम्मदसना दिली. यावेळी या रॅलीचे पुष्पवृष्टी, बँड बाजाच्या निनादात व फटाक्यांची आतषबाजी करीत ठिकठिकाणी चौकाचौकात पुष्पवृष्टी व अभिवादन करीत जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. तर तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशास अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या महायात्रेचे समितीचे समन्वयक पृथ्वीराज चिलवंत, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ ओव्हाळ, विशाल शिंगाडे, अरुण बनसोडे, अतुल लष्करे, दीपक सरवदे, गणेश वाघमारे, सुनील बनसोडे, राजन जोगदंड, ॲड रामचंद्र ढवळे, विनोद जानराव, नितीन लांडगे, विजय गायकवाड, राजेंद्र आंगरखे, सचिन दीपक, अजय सरवदे, प्रशांत सोनवणे, बाबासाहेब जानराव, विद्यानंद वाघमारे, भाऊसाहेब अणदूरकर, दत्तात्रय लोखंडे, आशाताई कांबळे, रेश्मा घरबुडवे, आशा शिंगाडे, ललीता शिंगाडे, उषा भालेराव, अनोखी वाघमारे, शिला जानराव, मिरा शिंदे, कल्पना कांबळे, काजल गायकवाड, शिला पवार, जयश्री चंदनशिवे, आशा हजारे, संध्या माळाळे, काजल माळाळे, सृष्टी वाघमारे, कोमल भोसले, शोभा खंडागळे, कोंडाबाई सिरसाठ आदींसह बौद्ध बांधव, उपासक व उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेट सहकार गौरव सर्वोत्कृष्ट संस्था २०२२-२३ पुरस्काराने सन्मानित




धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटच्यावतीने सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या संस्थांना देण्यात येणारा
सहकार गौरव सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार धाराशिव येथील श्री सिद्धिविनायक मल्टीस्टेट सहकार संस्थेला सन २०२२–२३ भारत सरकारच्या सहकार खात्याचे सचिव आशीष भुतानी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संस्थेचे चेरमन दिनेश कुलकर्णी यांनी स्विकारला.

शिर्डी येथे या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, सहकार खात्याचे नाशिकचे विभागीय निबंधक संभाजीराव निकम, महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह क्रेडिट फेडरेशनचे चेअरमन काकासाहेब कोयटे, फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को.ऑप क्रेडिट सोसायटीचे चेअरमन सुरेश वाबळे, बुलढाणा अर्बन मल्टिस्टेटचे चेअरमन राधेश्याम चांडक, अहमदनरचे जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांच्या आदी उपस्थित होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार जाधव, सिध्दीविनायक जिल्हा पतसंस्थेचे चेअरमन गणेश कामटे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद गोरे आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावे - डॉ. घोष




धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे स्वच्छता ही सेवा २०२४ ही मोहीम दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे राबवावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले आहे.

पुढे बोलताना डॉ घोष म्हणाले की, यावर्षीच्या स्वच्छता ही सेवा या मोहिमेसाठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता.... ही थीम निश्चित केली आहे. या मोहिमेत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात १७ सप्टेंबर रोजी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून अभियानाचा शुभारंभ करण्यात येईल. तर १८ सप्टेंबर रोजी सफाई मित्र सुरक्षा शिबिर घेण्यात येणार असून सफाई मित्रासाठी एक खिडकी योजनेद्वारे लाभ देण्यात येईल. तसेच १९ सप्टेंबर रोजी अस्वच्छ ठिकाणांची कायमस्वरूपी स्वच्छता करण्यात येणार आहे. तर २० सप्टेंबर रोजी गावातील खाऊ गल्लीच्या ठिकाणी निघणाऱ्या कचऱ्यांची लोकसहभागातून स्वच्छता करण्यात येणार असून २१ सप्टेंबर रोजी संस्कृतिक कार्यक्रमाद्वारे स्वच्छतेसाठी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच २२ सप्टेंबर रोजी एकल प्लॅस्टिक न वापरण्याबाबत जनजागृती तर २३ सप्टेंबर रोजी गृहभेटीद्वारे जनजागृती करून...एक झाड आईच्या नावे....उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच २४ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर स्वच्छता ज्योत, मॅरेथॉन सायकल मॅरेथॉन, स्वच्छता रॅली, मानवी साखळी तर २५ सप्टेंबर रोजी शाळा व महाविद्यालयात टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे स्पर्धा, व २६ सप्टेंबर रोजी सार्वजनिक शौचालयाची साफसफाई व दुरुस्ती. तसेच २७ २० सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत स्वच्छ वार्ड स्पर्धा तर २८ २० सप्टेंबर रोजी वैयक्तिक स्तरावर कंपोस्ट खतखड्डा व शोषखड्डा निर्मिती करणे व २९ सप्टेंबर रोजी स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत निर्मिती करण्यात आलेल्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात येणार असून ३० सप्टेंबर रोजी स्वच्छतेची वाहने व उपकरणांची स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तर १ ऑक्टोबर रोजी स्वच्छता प्रतिज्ञा व २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता दिवस साजरा करण्यात येणार आहे. या अभियानात ग्रामपंचायतीसह गावातील सर्व शाळा, अंगणवाडी, शासकीय कार्यालये, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन उपक्रमात हिरीरीने सहभागी होऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवावी असे आवाहन अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका प्रांजल शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) श्याम गोडभरले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल ताकभाते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) देवदत्त गिरी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिवाजी पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे यांनी केले आहे.

**स्वच्छता ही सेवा या मोहिमे अंतर्गत दि.१९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात....एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी.... महाश्रमदान करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व गावांनी यात सहभागी होऊन सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत श्रमदान करावे. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक- युवती, सेवाभावी संस्था, समाजसेवक, महिला बचत गट यांचा सहभाग राहणार आहे. या महाश्रदानात प्राधान्याने धार्मिक, अध्यात्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, नदी किनारे, कार्यालय, व्यावसायिक व बाजारपेठ आदी परिसरात स्वच्छता करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.**

# केंद्र सरकारच्या निर्णयामुळे सोयाबीन, कांदा दरात वाढ होईल – आ. पाटील



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – केंद्र सरकारने आयात शुल्क वाढवून व निर्यात धोरणात सकारात्मक बदल केल्याने याचा केवळ सोयाबीनच नव्हे तर कांद्याचे भाव वाढण्यासही नक्कीच फायदा होईल असा विश्वास भाजपचे आ राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.१५ सप्टेंबर रोजी व्यक्त केला.

धाराशिव शहरातील प्रतिष्ठान भवनमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, सतिश दंडनाईक, रामदास कोळगे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, अभय इंगळे, अजित पिंगळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, केंद्र सरकारने नुकताच आयात शुल्क वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे देशातंर्गत उत्पादीत शेती मालास भाव वाढण्यास मदत होईल. आपल्याकडे पामतेल मोठ्या प्रमाणात आयात होते. त्याच्यावरही याचा परीणाम होऊन देशांतर्गत तेलबियांच्या दरात वाढ होण्यास मदत होऊन त्याचा फायदा सोयाबीन उत्पादकांना होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर निर्यात धोरणातही केंद्राने घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे देशातील कांदा व इतर शेतीमालास जागतिक बाजारपेठेत जाण्यास व चांगला दर मिळण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सोयाबीन दराबाबत किमान ५ हजार रुपयांपेक्षा जास्तीचा भाव मिळावा यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहाण यांच्याकडे विनंती करून पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी केंद्र सरकारही सकारात्मक पाऊल टाकत असून याबद्दल त्यांनी केंद्र सरकार व ना. फडणवीस यांचे आभार मानले. तसेच कांदा व सोयाबीनला वाढीव दर मिळावा यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील असून याबाबत येत्या काळात आणखी सकारात्मक निर्णय होतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यात २०२३ मध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५ हजार रुपये मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू असून याचा राज्यातील १८ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तर २०२३ मध्ये पीक विम्यापोटी २५ टक्के अग्रीम मिळाला. मात्र केंद्र सरकारच्या नवीन अधिसूचनेमुळे अडचण निर्माण होऊन ३२ मंडळातील शेतकरी उर्वरीत ७५ टक्के मदतीपासून वंचित असून याबाबतही केंद्रीय कृषीमंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू असून याचा लवकरच सकारात्मक निर्णय होईल असे त्यांनी नमूद केले. तसेच २०२०, २०२१ मधील पीक विम्यासाठी नियमित शासकीय अभियोक्त्यांबरोबरच उच्च व सर्वोच्च न्यायालयात शेतकऱ्यांसाठी ॲड. घोडे पाटील हे अतिरिक्त विधीज्ञ बाजू मांडण्यासाठी राहतील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ३० महिन्यात रेल्वेचे काम पूर्ण होणार

**धाराशिव-तुळजापूर-सोलापूर या रेल्वे मार्गाचे काम संबधित कंत्राटदाराकडून सुरू करण्यात आले आहे. त्यासाठीची आवश्यक यंत्रणा दाखल झाली आहे. हे काम ३० महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे निविदेमध्ये नमूद आहे. परंतू, आपण पाठपुरावा करून त्या वेळेपूर्वी काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी सुरूवातीस दर १५ दिवसास व नंतर प्रत्येक महिन्यास कामाचा आढावा घेतील असेही त्यांनी सांगितले. तसेच डिसेंबरमध्ये घाटणे बॅरेजेसमधून पांगरदरवाडी तलावात व तेथून रामदरा तलावात पाणी आणण्याची प्राथमिक चाचणी होईल असे आ. पाटील यांनी सांगितले.**

यशवंत
धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## भोसले हायस्कूलमध्ये मॉकड्रिल प्रात्यक्षिक पडले पार

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – येथील श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांचे भूकंप व आग विरोधी मॉकड्रिल यशस्विरित्या घेण्यात आले. विविध अभिरूप अनुभवांचा उपयोग करून हे प्रशिक्षण देण्यात आले.

धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलच्या मैदानावर हे मॉकड्रिल पर्यवेक्षक आर.बी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व उपमुख्याध्यापक प्रमोद कदम यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना नैसर्गिक किंवा कृत्रिम आपत्तीत स्वतः चे आणि इतरांचेही रक्षणासाठी काय करावे ? याचे प्रत्यक्ष अनुभव या मॉक ड्रीलच्या माध्यमातून प्रशालेत देण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक धनंजय देशमुख , एन.एन. गोरे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# गणपती विसर्जन व धार्मिक मिरवणूका कायद्याचे उल्लंघन करू नये - जाधव

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील एक हजार पेक्षा जास्त सार्वजनिक गणेश मंडळामार्फत श्री विसर्जन सोहळा पार पडणार आहे. तसेच धार्मिक मिरवणूक दरम्यान नागरिकांनी न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करूनच, मिरवणुका काढाव्यात, न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करू नये. असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी दि.१६ सप्टेंबर रोजी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन उपस्थित होते. पुढे बोलताना जाधव म्हणाले की, १७ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन होणार आहे. तर १८ आणि १९ या दोन्ही दिवशी ईद ए मिलाद, निमित्त जुलुस मिरवणूक होणार आहे. या दरम्यान सर्वधर्म समभाव जोपासावा.

या सार्वजनिक कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा पोलिस दलाच्यावतीने सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी उपविभागीय दर्जाचे ५ अधिकारी, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे १२० अधिकारी, १३५० पोलीस शिपाई महिला व पुरुष तर ७५० होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांच्या सोबतीला अति जलद पथक (क्यूआरटी) आर.सी.पी. देखील कार्यरत आहेत. तर एस.आर.पी. देखील पथक उपलब्ध असणार आहे. मिरवणूक व उत्सवा दरम्यान लेजर बल्ब, डीजे यांचा वापर सार्वजनिक गणेश मंडळांनी टाळावा, वाद्य वाजवताना दिलेल्या नियमावलींचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी. मिरवणुकी दरम्यान महिला व लहान मुलांची विशेष दक्षता पोलीस पदकामार्फत घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जनतेने कायद्याच्या चौकटीत राहूनच हे सर्व उत्सव, सण आनंदामध्ये पार पाडावेत. १७ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत वाद्य वाजवण्याला परवानगी असणार आहे. मात्र, त्यानंतर वाद्य वाजवता येणार नसल्याचे सांगत त्यांनी जर या नियमांचे उल्लंघन केले तर संबंधितावर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा जाधव यांनी दिला.



## पदोन्नतीनिमित्त अभियंता काळे व नाईकवाडी यांचा सत्कार



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – अभियंता नागनाथ काळे व धनराज नाईकवाडी यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष महेश भगत यांनी त्यांचा येथोचित सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांच्यावतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाखा अभियंता काळे व नाईकवाडी त्यांना बढती मिळाली असून ते उप अभियंता या पदावर रुजू झाले आहेत. त्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण चावरे, मराठा सेवा संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सतीश पाटील, डी.आर. कदम, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तुषार पाटील, बलराज रणदिवे, रोहित पडवळ, कार्याध्यक्ष विजय पवार, आकाश मुंडे, घाडगे, क्रीडाईचे अध्यक्ष शाम नाईकनवरे, गोरक्ष मोहिते यांच्यासह मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे प्रतिबंधात्मक आदेश लागू

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा ७६ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे.या दिवशी विविध पक्ष,संघटना व ईतर नागरिक यांच्याकडून आपल्या मागण्यांसाठी मोर्चे, धरणे, उपोषणे, आत्मदहन, रास्तारोको आदी आंदोलनात्मक कार्यक्रम करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा ७६ व्या वर्धापन दिनी पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,धाराशिव या ठिकाणीही मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.

१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या ७६ वर्धापन दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमाच्या ध्वजारोहणासाठी पालकमंत्री हे शिंगोली सर्किट हाऊस येथून जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे मोटारीने येणार आहे.या अनुषंगाने शिंगोली सर्किट हाऊस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा धाराशिव या परिसरात भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश आज १६ सप्टेंबर रोजी रात्री १२ ते १७ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाचे वेळी कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येणार नाही व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याकरिता १६ सप्टेंबरच्या रात्री १२ ते १७ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजतापर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ ची कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहे.

धाराशिवचे उपविभागीय दंडाधिकारी संजय डव्हळे यांनी वरील संहितेच्या कलमाच्या प्राप्त अधिकाराचा वापर करून हे आदेश १६ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजतापासून ते १७ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजतापर्यंत शिंगोली सर्किट हाऊस ते जिल्हाधिकारी कार्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या परिसरात लागू राहतील.त्यामुळे या परिसरात उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चे, रॅली, रास्ता रोको व ध्वनिक्षेपकाचा वापर इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## काळे यांच्या हस्ते रमाई नगरातील सिमेंट रस्त्याच्या कामाचे उद्घाटन



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत धाराशिव शहरातील रमाई नगर येथे सिमेंट रस्ता कामाचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून रमाई नगर येथील सिमेंट रस्ता कामासाठी विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे रमाई नगर परिसरातील नागरिकांतून समाधान व्यक्त केले आहे. यावेळी नितीन काळे म्हणाले की, राज्य व केंद्रातील सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार असून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहोचवल्याशिवाय हे सरकार शांत बसणार नाही. आगामी काळात शहराच्या व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आ. पाटील व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी सदैव तत्पर असून जे जे काही करता येईल ते सर्व करण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## जमाते इस्लामी हिंद व एसआयओच्यावतीने रक्तदान करुन पैगंबर जयंती साजरी

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त जमाते इस्लामी हिंद युथ मुव्हमेंट व एसआयओ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास रक्तदात्यांनी मोठा प्रतिसाद देऊन खऱ्या अर्थाने पैगंबर यांना अपेक्षित व साजेशी जयंती साजरी केली आहे.

धाराशिव शहरातील शिरीन कॉलनीतील युनिक फॅब्रिकेशन येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विश्वास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे, ईद मिलाद जुलूस कमिटीचे खलील सय्यद, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे मसूद शेख, माजी नगराध्यक्ष मोईनुद्दीन पठाण, खलील पठाण, इलियास पिरजादे, जमाते इस्लामी हिंदचे शहर अध्यक्ष समिती सजियोद्दीन शेख, युथ मुव्हमेंटचे आसिफ शेख, तौफिक पठाण, एसआयओचे शहराध्यक्ष



निहाल पटेल, आयाज सिद्दिकी आदी उपस्थित होते. यावेळी विश्वास शिंदे व सजियोद्दीन शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करीत उपस्थितांना मार्गदर्शन केले. रक्त संकलन धाराशिव जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढीचे रक्त संकलन अधिकारी डॉ गणेश साळुंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. यावेळी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या हस्ते जुनोनीसह विविध शिवसेना शाखेचे उद्घाटन




धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – शिवसेना पक्ष विस्तारीकरण व गावकऱ्यांच्या भेटीवर जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी भर दिला असून धाराशिव तालुक्यातील जुनोनी, वलगुड, सुर्डी व बेगडा येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते धुमधडाक्यात करण्यात आले आहे.

हिंदू हृदयसम्राट तथा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाने धाराशिव जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी शिवसेना शाखा उद्घाटनाचा सपाटा लावला आहे. त्यांच्या पुढाकारातून व संकल्पनेतून जुनोनी येथील शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पाटील यांना गावातील नागरिकांनी मूलभूत अडचणी सांगितल्या. त्या सोडण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी जुनोनी येथील नागनाथ पाटील, अकबर शेख, राजा शेख, अण्णा पाटील आदींसह व ग्रामस्थ उपस्थित होते. तर वलगुड येथेही शिवसेना शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांनी रस्ता, इतर कामांच्या अडचणी सांगितल्या. त्या सोडविण्यासाठी नक्की पाठपुरावा करू असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी बिभिषण जाधव, भारत जाधव, भोंग, शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सुर्डी येथील शिवसेना शाखेचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी गावातील गावकऱ्यांनी धोंडेबुवा महाराज मंदिराच्या सभा मंडपाचे बऱ्याच दिवसांपासून रखडलेले काम शासन दरबारी मार्गी लावण्याची मागणी केली. ते काम शासन दरबारी लवकरात लवकर मंजूर करून पूर्ण करण्याच्या आश्वासन त्यांनी दिले. यावेळी नाना पाटील, श्रीकांत देशमुख, मनोज अण्णा चोपाटे, रमेश शेलार, माळी पांडागळे, कांबळे, लोभे, माने, जोगाडे आदींसह शिवसैनिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच बेगडा येथील शाखेचे पाटील व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांनी बऱ्याच दिवसांपासून रखडलेले विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभामंडपाचे काम व गावातील दोन मंदिर बांधून द्यावी अशी मागणी पाटील यांच्याकडे केली. यावेळी पोपट साळुंखे, दीपकराव देशमुख, नाना शेंदारकर, रमेश साळुंखे, कसबे, क्षीरसागर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२४ विविध कार्यक्रमांनी होणार साजरा

### साडेतीन शक्तीपीठातील आदिशक्ती आदिमाया देवीच्या पायाचे कुंकू व वाण वाटणार

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – शहरातील बाळासाहेब ठाकरे नगर येथे ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२४ चे आयोजन दि.३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आली आहे. या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. देवी आणून बसविण्यापासून ते मिरवणुकीपर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन व नियोजनची जबाबदारी महिलांकडे सोपविण्यात आली असून खऱ्या अर्थाने महिला शक्तीचा सन्मान केला आहे. दि.३ ऑक्टोबर रोजी येडेश्वरी मंदिरातून देवीची पायी ज्योत आणण्यात येणार असून साडेतीन शक्तीपीठातील आदिशक्ती आदिमाया देवींच्या पायांचे कुंकूरुपी आशीर्वाद कुंकू व वाण आणण्यात येणार आहे. ते देखील घरोघरी स्थापन करण्यात येणाऱ्या घटांसाठी वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचा लाभ देवीभक्तांसह सर्व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन ठाकरे नगर नवरात्र महोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रमुख प्रशांत साळुंके यांनी केले आहे.

धाराशिव शहरातील बाळासाहेब ठाकरे नगर येथे गेल्या २२ वर्षांपासून नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून यंदा हे २३ वे वर्ष आहे. या नवरात्र महोत्सवास विविध कार्यक्रम राबविले जात असल्यामुळे सर्व समाजातील नागरिक यामध्ये स्वतःहून सहभाग नोंदवीत आहेत. या नवरात्र महोत्सवाच्या आधारस्तंभ शामल साळुंके तर अध्यक्षा म्हणून सुरेखाताई खांडेकर व उपाध्यक्षा सत्यशीला गायकवाड व सचिव प्रतिभा गाडे तसेच मिरवणूक प्रमुख



लता इंगळे, श्रद्धा उगलमोगले यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर रांगोळी प्रमुख शिवानी कोळी व योगिता निलंगे तसेच आरतीचे नियोजन कोमल कदम व वर्षा डोके यांच्याकडे तर भोगी प्रमुख म्हणून मीनाक्षी महामुनी व मंगल सलगर तर स्पर्धाप्रमुख म्हणून निकिता सिरसट व दिपाली चौधरी तसेच देवी आणण्याचे नियोजन रेखा शिंदे व दिपाली गायकवाड यांच्याकडे तर महाप्रसादाचे नियोजन रुक्मिणी सुर्यवंशी, सुरेखा पवार, अनारकली शिंदे व सत्यभामा खोत तसेच होम विधीचे नियोजन शितल कसपटे व इंदू जगताप यांच्याकडे तसेच दांडिया प्रमुख म्हणून लता राठोड, शुभांगी काळे व राणीताई काळे यांच्याकडे तर आराधी गीत प्रमुख म्हणून अनितातार्ई शेंडगे व विमल साठे तर कुंकू मार्चनचे नियोजन योजनाबाई सलगर, अर्चना सोनटक्के व पूजा वाघमारे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तसेच लहान मुलांसाठी रंगसंगती स्पर्धा व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचे सर्व नियोजन महिला शक्ती असलेल्या महिलांकडे देऊन खऱ्या अर्थाने महिला सशक्तिकरण करण्याचे काम या उत्सव मंडळाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे.

**देवी मंडपात आराध्यांची गाणी होणार सादर**

घटस्थापनेपासून दररोज देवी मंडपामध्ये सायंकाळी देवींची आराधी गाणी सादर केली जाणार आहेत. दांडिया, चित्रकला प्रशिक्षण, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तर आराधी गाण्यांमध्ये गुरुवार दि.३ ऑक्टोबर रोजी आराधी गाणी, शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी पोपट खिल्लारे, शनिवार दि.५ ऑक्टोबर रोजी चांदनाबाई कांबळे, रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी दादा माळी (अंबेजवळगे), सोमवार दि.७ ऑक्टोबर रोजी किशोर धुत (बीड), मंगळवार दि.८ ऑक्टोबर रोजी सांजा येथील आराधी मंडळ, बुधवार दि.९ ऑक्टोबर रोजी बोंदर (उत्तमी कायापुर), गुरुवार दि.१०ऑक्टोबर रोजी साखरबाई टेकाळे व विष्णू देडे तर शुक्रवार दि.११ ऑक्टोबर रोजी वैराग येथील आराधी मंडळ तसेच शनिवार दि.१२ ऑक्टोबर रोजी होम विधी दसरा कार्यक्रमाने उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# सुरक्षित बालकच देशाचे भवितव्य सुरक्षित ठेवेल : ॲड.प्रवीण पाटील



लातूर /प्रतिनिधी- प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग,लातूर संवेदना प्रकल्प,हरंगुळ (बु) व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लातूर व धाराशिव येथील दिव्यांग शाळांचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, अधीक्षक व लिपिक यांना आधार फाउंडेशन धनेगाव ता जि लातूर चे अध्यक्ष तथा तज्ञ प्रशिक्षक बालहक्क संरक्षण आयोग,मुंबई ड.प्रवीण हणमंतराव पाटील यांनी बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण कायदा २०१२ (POCSO ACT )चे प्रशिक्षण दिले. यावेळी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,लातूर श्री.अविनाश देवशटवार, जिल्हा पुनर्वसन केंद्र,लातूरचे अध्यक्ष श्री. सुरेश पाटील, समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद लातूर श्री.संतोषकुमार नाईकवाडे, समाज कल्याण आयुक्तालय पुणे चे अधिकारी श्री .काथवटे सर,श्री.फुले सर, सहाय्यक सल्लागार समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर श्री वाकडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ॲड.प्रवीण पाटील यांनी बालहक्क संरक्षण म्हणजे काय ? त्यामध्ये शाळा व्यवस्थापन यांनी कोणती काळजी घ्यावी ? बाल लैंगिक शोषण विरोधी कायद्याचा उद्देश काय? यातील बालकाच्या संरक्षणाकरिताच्या तरतुदी कोणत्या ? बालकाच्या हक्कांना बाधा आणणाऱ्या घटकांना शिक्षेच्या तरतूदी कोणत्या? यांची माहिती दिली व शाळेचे वातावरण बालकेंद्रित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगून बदलापूर येथील झालेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याकरिता आपण सर्वांनीच बाल हक्क संरक्षणाची जबाबदारी उचलून कसलीही अनुचित घटना घडू नये याकरिता पूर्वकाळजी घेणे आवश्यक असुन सुरक्षित बालकच देशाचे भवितव्य सुरक्षित ठेवणार असल्याचे सांगितले व सदरील कार्यशाळा आयोजित करून हा संवेदनशील विषय विषयावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आयोजकांचे आभार व्यक्त केले. यावेळी प्रादेशिक उपायुक्त देवशटवार यांनी सदरील प्रशिक्षणातून दिव्यांग शाळांच्या व्यवस्थापनाला महत्त्वपूर्ण माहिती मिळाली असून याचा उपयोग आपण आपल्या शाळेतील बालकांच्या संरक्षणाकरिता करावा असे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भारतीय पुनर्वास परिषदेचे सदस्य श्री व्यंकटेश लामजने यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री गजानन बहुउद्देशीय संस्था,बोरी चे अध्यक्ष श्री अण्णा कदम यांनी केले.

# कस्तुरी या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सिनेमाचे लातूरात विशेष स्क्रीनिंग

## अभिजात फिल्म सोसायटीचा उपक्रम । दिग्दर्शक विनोद कांबळे यांची उपस्थिती




लातूर : येथील अभिजात फिल्म सोसायटी तर्फे कस्तुरी या सिनेमाच्या विशेष खेळाचे आयोजन दि २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर कंचन सभागृहात करण्यात आले आहे. सिनेमानंतर दिग्दर्शक विनोद कांबळे यांच्यासोबत परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले आहे.

कनिष्ठ समजली जाणारी कामं करणाऱ्या कुटुंबातल्या गोपी या मुलाची ही कथा आहे. आपल्या कपड्यांचा वास घालवू शकेल अशा कस्तुरीच्या शोधाची त्याची गोष्ट वास्तववादी पद्धतीने मांडली गेली आहे. या सिनेमाला सर्वोत्कृष्ट बालपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला असला तरी प्रौढ प्रेक्षकांशी देखील तो तितक्याच सक्षमपणे संवाद साधू शकतो. या खास स्क्रिनिंगसाठी सिनेमातले प्रमुख कलाकार समर्थ सोनवणे आणि श्रवण उपलकर यांचीही विशेष उपस्थिती राहणार असून प्रवेश विनामूल्य असणार आहे. अधिकाधिक लातूरकर सिनेरसिकांनी या सिनेमाचा लाभ घ्यावा असे आवाहन या निमित्ताने अभिजात फिल्म सोसायटीच्या कार्यकारीणीकडून करण्यात आले आहे.

# ब्लू बर्ड इंटरनॅशनल स्कूल आलमला मुख्यमंत्री माझी शाळा अभियानांतर्गत औसा तालुक्यात खाजगी शाळांमधून प्रथम



औसा (प्रतिनिधी ) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा -टप्पा क्र. २ या महाराष्ट्र शासनाच्या शालेय स्पर्धात्मक अभियानांतर्गत औसा तालुक्यातून शासकिय शाळा १७९ तर उर्वरित इतर व्यवस्थापनाच्या खाजगी शाळा ७६ अपंग शाळा ५ आश्रमशाळा ९ इंग्रजी माध्यमच्या १७ अश्या एकूण १०७ शाळामधून ब्लू बर्ड इंटरनॅशनल स्कूल आलमला या शाळेने प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला.

या अभियानांतर्गत पायाभूत सुविधा ३३ गुण, शासन ध्येय धोरणे अंमलबजावणी ७४ गुण व शैक्षणिक गुणवत्ता ४३ गुण असे एकूण १५० गुणांचे मुल्यांकन करण्यात आले. प्रथम शाळा पातळीवर मुख्याध्यापका मार्फत मूल्यांकन करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक तालुक्यातील १४ केंद्राचे केंद्रप्रमुख यांच्याकडून केंद्र स्तरीय मूल्यांकन होऊन प्रत्येक केंद्रांतून प्रथम येणारी एक शाळा तालुका मुल्यांकनासाठी उपलब्ध करण्यात आली. पंचायत समिती औसाच्या वतीने १४ केंद्रांतून प्रथम येणाऱ्या शाळांचे मुल्यांकन करण्यात आले. या मुल्यांकनात ब्लू बर्ड इंटरनॅशनल आलमला स्कूलने औसा तालुक्यातून प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पटकावला.

हे अभियान शाळा पातळीवर यशस्वीपणे राबविल्याबद्दल शाळेच्या प्राचार्य स्वाती कापसे व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य प्रशांत धाराशिवे , विश्वेश्वर धाराशिवे , योगेश धाराशिवे ,प्राचार्य डॉ . कैलास कापसे, सर्व युनिट मधील विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

### लातूर जिल्ह्यात आज एक पेड माँ के नाम अभियान

लातूर / प्रतिनिधी: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिनी केलेल्या आवाहनानुसार लातूर जिल्ह्यात एक पेड माँ के नाम अभियान १७ सप्टेंबर २०२४ रोजी राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींमध्ये वृक्ष लागवड केली जाणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. प्रत्येकाने आपल्या आईसोबत किंवा आईला अभिवादन म्हणून यंदाच्या पावसाळ्यात देशी प्रजातीचे किमान एक झाड लावल्यास, आईसाठी ही अनमोल भेट ठरेल, या संकल्पनेतून एक पेड माँ के नामम हे अभियान राबविले जात आहे. निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी वृक्ष लागवड आवश्यक आहे. याकरिता १७ सप्टेंबर रोजी विशेष वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होवून प्रत्येकाने आपल्या आईसोबत किंवा आईला अभिवादन म्हणून किमान एक तरी झाड लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वृक्ष लागवड केल्यानंतर या झाडासोबतचे छायाचित्र https://merilife.nic.in या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# प्रा .डॉ पांडूरंग मुठ्ठे यांची स्व.मारोतराव कऱ्हाळे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

प्रशांत तांबोळकर

शिरूर अनंतपाळ : येथील शिवनेरी महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागप्रमुख , राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा डॉ पांडूरंग राजाराम मुठ्ठे यांची हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्व.मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ साठी निवड झाल्याचे पत्र पुरस्काराचे संयोजक शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी दिले आहे. पुरस्काराचे वितरण ऑक्टोबर महिन्यात होणार आहे.



प्रा .डॉ. पांडूरंग मुठ्ठे हे शिवनेरी महाविद्यालयात २००० पासून समाजशास्त्र विषयाचे अध्यापन करतात , त्यांचे म महिला सक्षमीकरण :स्वरूप आणि विकास व ्ुशप एर्ीीशीशपीं म असे दोन ग्रंथ संपादीत आहेत,त्यांचे अनेक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल मधून प्रकाशित आहेत. त्यांना यापूर्वी ही मराठा सेवा संघ व राजमाता जिजाऊ प्रतिष्ठाण , उदगीर महात्मा फुले जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. ते गेल्या दोन वर्षा पासून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून काम करीत आहेत, ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या समस्या सोडविण्यासाठी ते पुढे असतात या त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यांचा आढावा घेऊन राष्ट्रीय पातळीवरील नामांकित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

त्यांना हा पुरस्कार जाहिर झाल्या बदल संस्था अध्यक्ष प्रतापराव माने , सचिव पदमाकर मोगरगे , कोषाध्यक्ष जयेश माने , उपाध्यक्ष ड सुतेज माने , प्राचार्य डॉ ए बी धालगडे , समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ एस पी घायाळ , पोलिस निरीक्षक विठ्ठलराव दराडे, महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकोत्तर कर्मचारी , मित्र परिवार आदीनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# श्री गणेश विसर्जनापर्यंत मंगळवारी शहरात खाजगी ट्रॅव्हल्सना रात्री १० वाजेपर्यंत प्रवेश बंद

लातूर/प्रतिनिधी: लातुर शहरात दिनांक १७/०९/२०२४ रोजी श्रीचे विसर्जन असल्याने शहरात विविध मंडळातर्फे वाजत-गाजत श्री ची मिरवणुक काढण्यात येते. त्यामुळे जनतेच्या सोयीच्या व सुरक्षीततेच्या दृष्टीने लातूर शहरातील विसर्जन मार्गावर वाहतुक बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक असल्याने दिनांक १७/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.५० वाजेपर्यंत खालील मार्गावरील वाहतुक बंद करुन पर्यायी मार्गावर वळविण्यात येत आहे.

दिनांक १७.०९.२०२४ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.५० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असणार मार्ग

१. पी.व्ही.आर चौक ते दयानंद गेट,छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल, म.गांधी चौक,हनुमान चौक, गंजगोलाई पर्यंतचा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांना(मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक,टेम्पो,टॅक्सी, ट्रॅव्हल्स,मिनीडोर इ.) बंद राहील.२. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आदर्श कॉलनी, राजीव गांधी चौक ते बांधकाम भवन ३. स्वामी विवेकानंद चौक ते शाहू चौक,गंज गोलाई सुभाष चौक,दयाराम रोडने खडक हनुमान ,पटेल चौक,सिध्देश्वर चौक ते सिध्देश्वर मंदीर दिनांक १७.०९.२०२४ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.५० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग

१. पी.व्ही.आर चौकातुन छत्रपती शिवाजी महाराज चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही.आर.चौकातुन रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने जुना रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडचा वापर करतील. २. औसा रोडने शहरात येणाऐऱ्या एस.टी.बसेस या वाडा हॉटेल येथून रिंग रोडने, खाडगाव टी पॉइंट, पिव्हिआर चौक, रेल्वे स्टेशन चौक, नविन रेणापूर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथील बसस्थानक क्र २ चा वापर करतील. तसेच चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोड एल.आय. सी.कॉलनी, नाईक चौक,सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील. ३. रेणापुर रोडने शहरात येणाऐऱ्या एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथील बसस्थानकाचाच वापर करतील.रेणापुर रोडने येणारी चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने ही जुना रेणापुर नाका बालाजी मंदीर व खोरी गल्ली या मार्गाचा वापर करतील. ४. गंजगोलाई-सुभाष चौक-दयाराम रोड मार्गे-खडक हनुमान-सिध्देश्वर मंदिर या मिरवणुक मार्गावर सर्व वाहनास सदरचा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. ५. नांदेड रोडने शहरात येणाएया एस.टी.बसेस या गरुड चौक, सिद्धेश्वर चौक,नविन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. ६. तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १) राजस्थान विद्यालय ते दयानंद गेट या पॅरलल रोडचा २) गांधी चौक ते बस्वश्वेर महाविद्यालय - रमा चित्रपटगृह खोरी गल्ली शिवनेरी लॉज या मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणाए-या व जाणाए-या सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील.

तरी सर्व नागरीकांनी दि.१७.०९.२०२४ सकाळी १०.०० ते २३.५० वाजेपर्यंत पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळून प्रशासनास सहकार्य करावे.

### कौशल्या सोनकांबळे यांचे निधन

**निलंगा, दि.१४** - येथील बालाजीनगरातील रहिवासी कौशल्याबाई रमेश सोनकांबळे (वय ६०) यांचे गुरुवारी सोलापूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निलंगा येथे शुक्रवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा, जावई व नातवंडे असा परिवार आहे. विधीज्ञ रमेश सोनकांबळे यांच्या त्या पत्नी होत.

# आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून सांगवी येथे जाधव परिवाराचे सांत्वन



लातूर दि.१६- रेणापूर तालुक्यातील मौजे सांगवी येथील भाजपाचे जुने कार्यकर्ते कामराज जाधव यांचे नुकतेच दुर्दैवी निधन झाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रविवारी सकाळी सांगवी येथे निवासस्थानी जाऊन जाधव परिवाराचे सांत्वन केले. मयत कामराज यांच्या पत्नीस आर्थिक मदत करून आधार दिला.

भाजपा बूथ प्रमुख म्हणून कामराज जाधव यांनी काही काळ काम केले होते. त्यांच्या दुर्दैवी निधनाने जाधव परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रविवारी सांगवी येथे मयत कामराज जाधव यांच्या पत्नी यांना आर्थिक मदत करून आधार दिला. त्याचबरोबर मुलगा धीरज जाधव आणि तुषार जाधव यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. यावेळी भाजपाचे महेंद्र गोडभरले, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, ज्ञानोबा भिसे, अमर चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, अनुसया फड तर सांगवी येथील परमेश्वर जाधव, संतोष जाधव, मेघराज जाधव, सोमनाथ जाधव, प्रमोद जाधव, गोविंद जाधव, नानासाहेब जाधव, इंद्रजीत जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# पित्त होण्याची कारणे अन उपाय ?

आहार... तेलकट, तिखट, मसालेदार पदार्थ, लाल मांस, ह्या प्रकारचे अन्नपदार्थ आपण खाल्ले असतील तर हमखास पित्त होऊन छातीत जळजळ होते.

अपेय पान... आयुर्वेदात अपेय पान वर्ज्य सांगितले आहे. चहा, कॉफी, अल्कोहोल, निकोटिन युक्त पदार्थ म्हणजेच दारु, सिगारेट सतत सेवन केल्यास पित्त वाढते.

ऊन सहन न होणे... जर आपण तीव्र उन्हात काम करत असाल आणि तुमच्या शरीराला ऊन सहन झाले नाही तर शरीरातील पित्त वाढू लागते.

भावनिक ताण... कोणत्याही गोष्टीचा अति विचार करून भावनिक ताण तणाव आला असेल तर पित्त दोष उद्भवतो. पित्ताचा त्रास कमी करण्यासाठी काही घरगुती उपाय...

अमृत फळ आवळा... चवीला तुरट असा आवळा कफ आणि पित्त प्रकोप कमी करणारा आहे. त्यामधील व्हिटॅमिन सी अन्ननलिका, पोट स्वच्छ ठेवते. पित्ताचा त्रास होत असेल तर कच्चा आवळा थोडे मीठ लावून खाऊ शकता. आवळ्याचे चूर्ण करून ते कोमट पाण्यातून घेऊ शकता. हा उपाय काही दिवस सकाळी केल्यास पित्त विकार कमी होतो.

मूग आणि तांदूळ... जर तुम्हाला पित्त झाल्याने भूक लागत नसेल किंवा जळजळ होत असल्याने काय खावं कोणता आहार घ्यावा हे समजत नसेल तर मुगाचं साधं वरण आणि भात त्यावर तूप घालून काही दिवस घ्यावा. मूग पित्तशामक आहे. तसेच साधा मूग आणि तांदळाचा नीर डोसा देखील खाऊ शकता. तिखट, मसालेदार पदार्थ खाणे टाळावे.

उष्ण आलं आणि रसदार लिंबू... आपल्या मनात येईल आलं उष्ण तिखट आहे पण पूर्वीपासून आल्याचा पित्तशामक म्हणून वापर होतो. आल्यातील तिखट पाचक रसाने वाढलेले आम्लपित्त कमी होते. लिंबाचा रस त्यातील व्हिटॅमिन सी मुळे पित्तशय स्वस्थ होते. जेवणात आलं घ्यावं. तसेच आल्याचा तुकडा किसून मीठ, लिंबाचा रस, किंचित साखर घालून हे सरबत चमचाने थोडथोड पित राहावं.

कोकम... आमसूल किंवा कोकम काही घरात सहज उपलब्ध असते. त्यामधे देखील प्रचुर व्हिटॅमिन सी असते. कोकम सरबत किंवा आमसूल सेवन करून पित्त शमंत होते.

**थंड दुध...**

थंड दुध वाढलेली जळजळ कमी करते. थोडेसे थंड दूध किंचित खडीसाखर घालून प्यायल्यास पित्त कमी होते. छाती आणि पोटातील जळजळ थांबते.

पिकलेले केळे... केळ्यातून शरीराला खूप जास्त पोटॅशियम मिळतं. त्यामुळे केळ खाल्ल्यास पोटातील आम्ल निर्मितीची प्रक्रिया मंदावते. तसेच शरीराल फायबर मिळते जे पचन क्रिया वेगवान करते.

पित्त जर कायमचे कमी करायचे आसेल तर १)तुलसी ड्रॉप २)ॲलो डायजेस्ट ३)अलवेरा ज्युस याचे रोज सकाळी ऊठल्याबरोबर कोमट पाण्यात ५थेंब टाकुन १महिना नियमीत सेवन करा यासाठी कोणतीही नंतर गोळी खायची गरज नाही.

# मनातलं शब्दात

बस, तुम कभी रुकना मत! आज आजी उदास आहेत. हे आजोबांच्या लक्षात आल .काय झालं ग??? आजोबांनी विचारल . आजी म्हणाल्या अहो, आता थकवा येतो .आधी सारखं राहिलं नाही. आता गडबड ,तडतड सहन होत नाही. कुठे जायचं म्हंटल तर जास्त चालवत नाही. आटो मधे चढताना त्रास होतो . कधी भाजीत मीठ टाकायला विसरते तर कधी जास्त पडतं. कशाकरिता हे एवढं आयुष्य देवाने दिलं आहे. माहित नाही .

आजोबा म्हणाले, देवाचा हिशोब मला माहित नाही. आणि त्याच्या निर्णयात आपण ढवळाढवळ करू शकत नाही. त्याच्या श्रिरपपळपस मधे एक क्षणाचाही बदल करणे. आपल्या हातात नाही. जे आपल्या हातात नाही, त्याचा विचार करण्यापेक्षा आपल्या हातात काय आहे?? त्याचा विचार करावा. अग ,वयानुसार हे सर्व होणारच. आधीचे दिवस आठव ना किती काम करायची. पूर्ण घर तू खूप छान सांभाळले. मला कशाची काळजी नव्हतीच कधी . आता वयामाना प्रमाणे हे सर्व होणारच पण त्यातुनच मार्ग काढायचा असतो .आलेला दिवस आनंदात काढणे आपल्या हातात आहे. जीवनाच्या प्रत्येक फेज मधे थोडे शारिरीक बदल होतातच .थोडे आपल्या ला करायचे असतात. आपली म श्रळषशीीं्रश्रशफीशेीसरपळश करायची ,म्हणजे ,आयुष्याची घडी, परिस्थिती प्रमाणे बदलायची असते .कळलं का ? आजोबा पूढे म्हणाले चल, आज सायंकाळी बाहेर जाऊ या आपण. छान ती नारंगी साडी नेस. बाहेरच जेवू . आजोबा संध्याकाळी आजींना घेऊन बाहेर पडले. व जवळच असलेल्या बसस्टाप वर जाऊन बसले. दोघे बराच वेळ तेथेच गप्पा मारत बसले . आजोबा आजी ना म्हणाले अगं, पाय दुखत असतील तर, मांडी घालून बस छान . . नंतर , मगणेश भेळ मखाऊनच घरी परतले. अगदी वयाला व तब्येतीला शोभेसे ीेंळपस आज होते दोघांचे . आजींची उदासी मात्र कुठे पळाली?? हे त्यांना कळलेच नाही . अगदी मीशषीशीहफ झाल्या . आज आजोबांनी आजीसाहेब साठी ेप श्रळपश मचेलळश्रश ीेंरपव मागवला. मोबाईल पकडून आजींचा खांदा दुखतो ना म्हणून .

आज आजींनी तर आजोबांना सकाळीच सांगुन टाकलं ,की मी आज सायंकाळी स्वयंपाक करणार नाही .काही तरी चमचमीत खायला घेऊन या . आजोबांनी आनंदाने समोसे ,ढोकळा , खरवस, दोन पुरण पोळ्या आणून आजींची इच्छा पूर्ण केली . .ते बघून आजी म्हणाल्याचं अहो, एवढं आणलंत ?? अग आज आणि उद्या मिळुन संपेल की . आज आजीं आजोबांची पार्टी छान झाली.

कोणी तरी खरंच खूप छान म्हंटलं आहे

खुशीयां बहुत सस्ती है इस दुनिया में ,

हम ही ढुंढतें फिरते हैं ,उसे मेहंगी दुकानों में्।

आजोबा बऱ्याच वेळा पासुन एका बाटलीचे झाकण उघडायचा प्रयत्न करत होते. ते पाहून अजय म्हणाला , द्या आजोबा मी उघडून देतो. तेंव्हा आजोबा म्हणाले अरे ,नको मी उघडतो. आता आम्हाला प्रत्येक कामात वेळ लागतोच . हे पर्रीीरिश्र आहे . पण काही हरकत नाही. जो पर्यंत करू शकतो तोपर्यंत काम करायचे. हे मी ठरवलं आहे . रोज फिरायला जाणे, भाजी आणणे, वीीींळपस करणे, भाजी चिरणे , ुरीहळपस ारलहळपश मधे धुतलेले कपडे वाळत घालणे, कपड्यांच्या घड्या घालणे ,अशी बरीच कामांची जबाबदारी मी घेतली आहे. तुझ्या आजीला पण मदत होते. व माझा वेळ जातो . Something new and different .I am enjoying it . nd I feel सेव .

तो तुमचा actor आहे ना, अक्षय कुमार त्याने एका advertisement मध्ये म्हंटले आहे

बस ,तुम कभी रुकना मत

अक्षय कुमार ने म्हंटलेले हे वाक्य मला खूप आवडलं. एक छोटसं वाक्य. मोजक्या शब्दात . पण किती अर्थपूर्ण .जेवढ्यांदा वाचावे, तेवढाच त्याचा अर्थ परत दर परत उघडत जातो .एक छोटासा उपदेश जीवनाला वेगळ्याच दिशेने वाटचाल करायची स्फुर्ती देतो.. विचारांत परिवर्तन आणतं. तो म्हणतो कधीही थांबू नका, चालत रहा. म्हणजेच मरलींळींशफ रहा. ममनाने आणि शरीराने .फ

वाहतं पाणी बघताना , एक वेगळीच उर्जा निर्माण होते .फ धारा म म्हणजे पुढे पुढे जाणारी, वाहणारी . तेच जमलेलं पाणी म्हणजे अनेक रोगांचा ऊगम. म्हणून पाण्याला जमू देत नाही आपण. जमलेल्या पाण्यात मच्छर किडे पडतात .पाण्याला वास येतो डेंग्यू पसरतो.

आयुष्याचे पण तसेच आहे. शक्य तेवढ रलींळींश राहणे ही प्रत्येकाचीच आवश्यकता असते .जसं जमेल ,जे जमेल, जे आवडेल ,जे झेपेल, ते करत रहाणे गरजेचे आहे.

चलती का नाम ही तो जिंदगी है ।

आपल्या पिढीने तरूणपणी एकमेकांचे हात हातात घेतले नाही /नसतील .पण वयाच्या या टप्प्यावर, एकमेकांचा हात प्रेमाने, काळजीने, विश्वासाने , हातात घेणे ही काळाची गरज आहे .

कुछ लोग हमेशा खुश और संतुष्ट रहते हे!
इसलिए नहीं की उनके जीवन में सबकुछ ठीक होता है!
बल्कि इसलिए की उनकी सोच हर हाल में सकारात्मक होती है!!!
ना थके कभी पैर
ना कभी हिम्मत हारी है।
जज्बा है परिवर्तन का जिंदगी में,
इसलिये सफर जारी है।

प्रत्येक दिवस उत्सव म्हणून साजरा करा. बस , तुम कभी रुकना मत.

**- अशोक शिवपुजे. पुणे.**

# पोलीस अधीक्षक जाधव यांचा व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने सत्कार



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) - नूतन पोलीस अधीक्षक संजय जाधव यांचा व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात पुष्पगुच्छ देऊन दि.१६ सप्टेंबर रोजी सत्कार करण्यात आला.

व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने पत्रकारांसाठी करण्यात येत असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती देण्यात आली. यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ वैद्य, व्हॉईस ऑफ मीडियाचे महानगराध्यक्ष मल्लिकार्जुन सोनवणे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग मते, प्रसिद्धी प्रमुख सलीम शेख, डिजिटल विंगचे जिल्हा उपाध्यक्ष जफर शेख, एज्युकेशन विंगचे किरण कांबळे, मुस्तफा शेख व प्रशांत कावरे आदी उपस्थित होते.

# अन् चाकूरच्या तरुणांनी पोलिस ठाणे लुटले

## मराठवाडा मुक्ती संग्रामात चाकूरच्या सुपुत्रांचे योगदान

चाकूर : निजाम सरकारच्या पोलीस ठाण्यातील तुकाराम नावाच्या शिपायाला आपलसं करून सहकारी स्वातंत्र्य सैनिकांच्या मदतीने ठाण्यातील बंदुका, दारुगोळा व इतर शस्त्रसाठा लुटला. निजामाचे खबरे, सैनिक व हस्तक अशा जवळपास २५ व्यक्तींना वयाच्या २२ व्या वर्षी बळीराम सोनटक्के यांनी यमसदनी पाठवले. अशा अनेक सशस्त्र क्रांतिकारी लढ्यातील आठवणी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने वयाच्या ९९ व्या वर्षी स्वातंत्र सैनिक बळीराम बापूराव सोनटक्के यांनी जागवल्या आहेत.

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाला असला तरी भारतातील तीन संस्थाने स्वतंत्र झाली नव्हती. त्या तीन संस्थानातील एक हैद्राबाद हे निजामाचे संस्थान होते. ते भारतात सामील होण्यास तयार नव्हते. निजाम राजवटीविरुद्ध मराठवाड्यातील अनेक शुरवीरांनी लढा पुकारून आंदोलन उभे केले अन् मराठवाडा निजामाच्या तावडीतून १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त केला. म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यानंतर तब्बल १ वर्ष १ महिना २ दिवसांनी मराठवाडा स्वतंत्र झाला. यामध्ये मराठवाड्यातील लातूर जिल्हातील चाकूर तालुक्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांचा सशस्त्र लढ्यात सक्रिय सहभाग होता. या लढ्याचा अमृत महोत्सव वर्षभर विविध कार्यक्रमांनी शासन स्तरावरून यावर्षी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने घेतलेला हा आढावा.

निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध व रजाकाराच्या आत्याचारविरुद्ध चाकूर तालुक्यातून अनेक तरुणांनी सशस्त्र लढा उभारला. या लढ्यात चाकूर येथील वयाच्या २२ व्या वर्षी उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले बळीराम बापूराव सोनटक्के आजही हयात आहेत. चाकूर, वडवळ नागनाथ, नळेगाव, जढाळा, रोहिणा, जानवळ, शिवणखेड बु. आदी गावातील अनेक तरुणांचा या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होता. खऱ्या अर्थाने हे स्वातंत्र्यविरच देशाचे प्रथम नागरिक आहेत.

त्याग, बलीदान, समर्पणाची ओळख नवीन पिढीला व्हावी म्हणून या थोर व्यक्तमत्वांचा व



त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान शासन स्तरावरून गेला जात आहे. चाकूर शहरातील गणेशराव कुलकर्णी, भिमसेनजी आर्य यांनी नागनाथ शेटे यांच्या घरी आर्य समाजाची शाखा चालू करून हिंदू संघटना उभी केली. तसेच गिरीधारीलाल नावंदर यांनी तालीम काढून पैलवानांची फौज तयार केली. नरसिंग भांगे यांनी शस्त्रे, बंदूका, बॉम्ब गोळे तयार करून पुरवठा केला. निजाम सरकारचे रजाकार सैन्य व पोलीसांकडून गावातील हिंदु नागरीकांस त्रास होत असल्याने आधीच हिंदु चिडून होते. पोलादी पुरुष सरदार वल्लभाई पटेल यांचे समर्थक व लातूररोड येथे रेल्वेने बिदरहून आलेले रजाकार सैन्य यांच्यात संघर्ष झाला. चाकूरातील स्वातंत्र्य सैनिकांनी पोलीस ठाण्यातील बंदुकांचा साठा रात्रीतून पळवला अन् दुसऱ्या दिवशी सशस्त्र लढा पुकारला. यामध्ये मारुती बावलगावे, बळीराम बापूराव सोनटक्के, निवृत्ती रेड्डी यांनी जय भवानी गल्लीमधे एक तासात पंचवीस रजाकार सैन्यास यमसदनी पाठवले. ही धूसपूस अनेक दिवस चालली होती. त्यात बाकी काही स्वातंत्र्य सैनिक भूमीगत रहिले परंतु बळीराम बापूराव सोनटके व निवृत्ती रेड्डी यांना अटक झाली. स्वातंत्र्य सैनिकांचा गावात व परिसरात दबदबा होता त्यामुळे न्यायालयात यांच्या विरोधात साक्ष देण्यास कोणीही तयार झाले नाही. या दोघांना अहमदपूर जेलमधे ठेवण्यात आले पण हे दोघे जेलमधे गोंधळ घालत असल्याने त्यांना बिदर येथे साखळदंडाने बांधून ठेवण्यात आले. त्यांना शिक्षा म्हणून बिदर येथे सहा महिण्यांची जेल झाली.

निजाम सरकारच्या पोलीस ठाण्यातील तुकाराम नावाच्या शिपायाला आपलसं करून सहकारी स्वातंत्र्य सैनिकांच्या मदतीने ठाण्यातील बंदुका, दारुगोळा व इतर शस्त्रसाठा लुटला. निजामाचे खबरे, सैनिक व हस्तक अशा जवळपास २५ व्यक्तींना वयाच्या २२ व्या वर्षी बळीराम सोनटक्के यांनी यमसदनी पाठवले. बळीराम सोनटक्के स्वतः पैलवान असल्यामुळे त्यांच्याकडे तालमीतील मित्रमंडळी मोठ्या संख्येने होती. याचा उपयोग त्यांनी निजाम राजवटीविरुद्ध आंदोलन उभे करण्यासाठी केला. या कार्याची दखल लक्ष्मण पेंटर लिखित 'मी पाहिलेला हैद्राबाद मुक्तीसंग्राम' या ग्रंथात घेण्यात आली आहे. निवृत्ती रेड्डी, गिरीधारीलाल नावंदर, लक्ष्मण पेंटर, नरसिंग भांगे, सिताराम ढोलगे, माणिकराव पाटील, रेवप्पा होळदांडगे, व्यंबकराव मोतीपवळे, गणपत कोळी, तानाजी वाघमारे, जिनदास बुरसे, देविदासराव जोशी, गोविंदराव दामोदर साळी, बळीराम होळदांडगे, गोविंदराव क्षीरसागर, देवराव जाधव, नागनाथ तुकाराम शेटे, हरिबा मोरे आदी ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांचा या लढयात सहभाग होता. या सशस्त्र क्रांतिकारी लढ्यातील आठवणी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्ताने वयाच्या ९९ व्या वर्षी स्वातंत्र सैनिक बळीराम सोनटक्के यांनी जागवल्या आहेत.

# आजपर्यंत ३ लाख ९२ हजार लाडक्या बहिणींनी भरले फॉर्म

धाराशिव (प्रतिनिधी) - राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी दि.१६ सप्टेंबरपर्यंत ४ लक्ष ३ हजार ८५१ महिलांनी अर्ज केलेले आहेत. त्यापैकी ३ लक्ष ९२ हजार ४२४ महिलांचे अर्ज योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले आहेत. आता या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर करण्यात आली आहे.

आता केवळ अंगणवाडी सेविकेमार्फतच अर्ज स्विकारले जाणार आहेत. जिल्ह्यातील कोणतीही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी यंत्रणा काम करीत आहे. जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांमध्ये २ लाख ४ हजार २१५ अर्ज संकेतस्थळावर आणि नारीशक्ती दूत ॲपवर प्राप्त झालेल्या १ लाख ८८ हजार २०९ अर्जाचा समावेश आहे. ज्या महिला या योजनेसाठी पात्र ठरत आहेत अशा महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये दरमहा १५०० रुपये जमा करण्यात येत आहेत. पात्र महिलांच्या बँक खात्यात स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्टपासून जुलै व ऑगस्ट महिन्याची एकत्र ३ हजार रुपये रक्कम जमा करणे सुरू झाले आहे. जिल्ह्यात ३ लाख २४ हजार ६५९ पेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट दिले असताना पात्र ठरणाऱ्या महिलांची संख्या जास्त आहे. बहुतांश पात्र लाभार्थी महिलांनी अर्ज भरले असून उर्वरित पात्र महिलांची अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. आता ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील कोणतीही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून आता वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. अर्ज केलेल्या पैकी नारीशक्ती दूत ॲपवर १ लाख ८९ हजार ८९२ तर पोर्टलवर अर्ज करणाऱ्या महिलांची संख्या २ लाख १३ हजार ९५९ इतकी आहे. नारीशक्ती ॲपवर प्राप्त १ लाख ८९ हजार ८९२ अर्जपैकी १ लाख ८८ हजार २०९ महिलांच्या अर्जांना मान्यता दिली आहे. पोर्टलवर २ लाख १३ हजार ९५९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २ लाख ४ हजार २१५ अर्जाना मंजुरी मिळाली. अशा एकूण ३ लाख ९२ हजार ४२४ अर्जांना तालुका समित्यांनी मंजुरी दिली आहे. या योजनेचा जिल्ह्यातील ३ लाख २४ हजार ६५९ महिलांना लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापेक्षा जास्त महिलांनी अर्ज केले. ज्या पात्र महिलांचे अर्ज सादर करणे बाकी आहे. त्या महिलांचे आता नागरी व ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रात बालवाडी सेविका, अंगणवाडी सेविकामार्फत ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज स्विकारले जाणार असून बँक खाते आधार संलग्न करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री शिंदे यांचा जिल्हाप्रमुख साळुंके यांच्या हस्ते जंगी सत्कार

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) - मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे धाराशिव येथे आले असता शिवसेना संपर्क कार्यालयात जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे यांच्या हस्ते हजारो शिवसैनिकांच्या उपस्थितीत ना शिंदे यांचा फेटा, जेसीबीच्या सहाय्याने अडीचशे किलोचा पुष्पहार घालून व अतिशय उत्साहपूर्वक आणि धुमधडाक्यात यथोचित सत्कार केला.

धाराशिव जिल्ह्यातील परंडा येथे मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान व मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर त्यानंतर धाराशिव



शहरात शिवसेना मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यापूर्वी आनंद नगर येथील जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या साळुंके कॉम्प्लेक्समधील शिवसेना संपर्क कार्यालयास मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी आवर्जून भेट दिली. यावेळी जिल्हाप्रमुख साळुंके यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचा ढोल ताशांचा कडकडाट, फटाक्यांची आतषबाजी व गगनभेदी घोषणा देत त्यांचा सत्कार केला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, शिवसेना प्रवक्ते योगेश केदार, युवासेना निरीक्षक नितीन लांडगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख भारतीताई गायकवाड, शिवसेना तालुकाप्रमुख अजीत लाकाळ, युवा सेना कळंब तालुकाप्रमुख ईश्र्वर शिंदे, व्हीजेएनटी जिल्हाप्रमुख कमलाकर दाणे, शिवसेना जिल्हा संघटक रंजीत चौधरी, युवासेना धाराशिव शहरप्रमुख सागर कदम, शिवसेना उपतालुका प्रमुख गोविंदा आवाड, उपतालुका प्रमुख दिनेश पवार, युवासेना कळंब शहरप्रमुख कृष्णा हुरगट, धाराशिव उपशहर प्रमुख रजनीकांत माळाळे, शिव उद्योग सहकारचे जिल्हाप्रमुख सुनील आप्पा शेरखाने, शिव उद्योग महिला जिल्हाप्रमुख सुवर्णमाला पाटील आदींसह पदाधिकारी व हजारोंच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# जिल्हास्तरावर उत्कृष्ट सुक्ष्म व लघु उद्योगांना मिळणार पुरस्कार

लातूर, / प्रतिनिधी: महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयातर्फे जिल्ह्यात असामान्य कामगिरी करणाऱ्या लघु उद्योग घटकांना प्रोत्साहन मिळावे, म्हणून दरवर्षी जिल्हास्तरावर उत्कृष्ट सुक्ष्म व लघु उद्योगांना पुरस्कार दिले जातात. प्रथम व द्वितीय पुरस्कार अनुक्रमे १५ हजार रुपये , १० हजार रुपये रोख, गौरवचिन्ह, शाल व श्रीफळ देवून गौरविण्यात येते. सन २०२४ या वर्षासाठी या योजनेतर्गत सुक्ष्म व घु उद्योग घटकामार्फत २५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाच्या वेळी, उद्योग घटक मागील तीन वर्षापूर्वी उद्य नोंदणी असणे आवश्यक आहे. कमीत कमी मागील सलग दोन वर्षापासून उत्पादनात असणे आवश्यक आहे. उद्योग घटकाने बँकेचे कर्ज घेतले असल्यास त्या कर्जाची नियमितपणे परतफेड केलेली असावी (थकबाकीदार असू नये). उद्योग घटकास यापूर्वी कोणताही (जिल्हास्तरीय, आंतरराष्ट्रीय) स्तरावरील पुरस्कार मिळालेला नसावा. महिला व मागासवर्गीय उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल. जिल्हा उद्योग केंद्राने विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करणे अनिवार्य आहे. या पात्रता धारण करणाऱ्या लातूर जिल्ह्यातील लघु उद्योजकांनी २५ सप्टेंबर, २०२४ पूर्वी जिल्हा उद्योग केंद्र लातूर यांच्याकडे विहीत नमुन्यात अर्ज करावेत अथवा अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी केले आहे.

# श्री गणेश विसर्जनासाठी महापालिकेची तयारी पूर्ण शहरवासियांसाठी १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र

## प्रदूषण टाळत मूर्ती संकलन केंद्रातच देण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी:प्रदूषण टाळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आपल्या घरी स्थापित केलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जन जलाशयात न करता मनपाच्या संकलन केंद्रांकडे त्या मुर्ती द्याव्यात. सार्वजनिक गणेश मंडळांनी १२ नंबर पाटी येथील खदानीत विसर्जन करावे,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.मुर्ती संकलनासाठी पालिकेकडून ३९४ अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शनिवार दि. ७ सप्टेंबर रोजी स्थापित केलेल्या श्रीगणेशाचे मंगळवारी (दि.१७ सप्टेंबर )विसर्जन होणार आहे.शहरातील नागरिक व भक्त गणरायाला निरोप देणार आहेत.प्रथेप्रमाणे श्रीगणेशाच्या मुर्तीचे जलाशयात विसर्जन केले जाते. गेल्या कांही वर्षांपासून प्रदूषण टाळण्यासाठी मनपा गणेश मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करते.यातून प्रदूषणाला कांही अंशी प्रतिबंध करता येऊ शकतो.गणेशभक्तांनी आपल्या मुर्ती संकलन केंद्रात देण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

सार्वजनिक गणेश मंडळांना आपल्या मोठ्या मूर्तीचे १२ नंबर पाटी जवळील खदानीत विसर्जन करता येणार आहे.यासाठी संबंधित मंडळांनी स्वतःच्या वाहनाने मूर्ती तेथपर्यंत आणाव्यात.श्री सिध्देश्वर मंदीर परिसर,कव्हा रोड, बांधकाम भवन या ठिकाणी मिरवणुकी नंतर श्री गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार आहे.

घरगुती गणेश मंडळांसाठी मनपाकडून शहरात १५ ठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात आली आहेत.या ठिकाणी मनपाचे कर्मचारी दिवसभर उपस्थित राहून मुर्तीचे संकलन करणार आहेत.नांदेड रस्त्यावर यशवंत शाळा,विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी,मंठाळे नगरमध्ये मनपा शाळा क्रमांक ९, सिध्देश्वर मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर,बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाण्याची टाकी,दयानंद महाविद्यालयाचा पार्किंग परिसर,सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी,टाऊन हॉल, बांधकाम भवन,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगर, साळे गल्लीतील यशवंत शाळा,तिवारी यांची विहीर,गणेश नगर व काशी विश्वेश्वर मंदिर ग्रीन बेल्ट या ठिकाणी यावर्षी मूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत.

श्री गणेश विसर्जना वेळी आपल्याकडील गणेश मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात. पालिकेकडून या सर्व मूर्तीचे १२ नंबर पाटीवरील खदानीत विधीवत विसर्जन केले जाणार आहे.नागरिक व गणेश भक्तांनी या उपक्रमात मनपाला सहकार्य करावे.प्रदुषणाला आळा घालण्यास सहकार्य करावे,असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# लाहोटी स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात साजरा

लातूर / प्रतिनिधी- राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी स्कूलच्या प्रांगणात गणेशोत्सव विविध उपक्रमांचे आयोजन करून उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्कूलच्या प्रांगणातून गणरायाची ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीमध्ये शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नववी व दहावी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी ङ्गजय जय गणेशा म या गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले व नृत्य सादरी करणानंतर श्री गणेशाची आरती करून पूजन करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया... च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु, मनोहर कबाडे, अरुल शेल्वी, रेश्मा चव्हाण आदींची उपस्थिती होती. गणेश उत्सवानिमित निमित स्कूल मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये भव्य रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. कला विभागाच्यावतीने पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली, यामध्ये विद्यार्थ्यांनी मातीपासून सुंदर गणपतीच्या मूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या सुंदर मूर्तीचे प्रदर्शन स्कूल मध्ये भरवण्यात आले होते.

पान १ वरून

### १५ लाख...

कोल्हापूर स्थानकावरही रेल्वे राज्यमंत्री सोमण्णा यांनी झेंडा दाखवला. यावेळी खासदार शाहू महाराज, खासदार धनंजय महाडिक यांच्यासह लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कोल्हापूर-पुणे वंदे भारत सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी सुटणार आहे. याचवेळी कोल्हापूर-मुंबई कोयना एक्स्प्रेसही सुटते. या दोन्ही गाड्यांची सुटण्याची वेळ आता एकच होणार आहे. यामुळे कोयना एक्स्प्रेसची सुटण्याची वेळ दहा ते पंधरा मिनिटांनी वाढवण्यात येणार आहे. याचा प्रवाशांना फायदा होणार आहे. कोयना एक्स्प्रेसची वेळ वाढवली तरी मिरजेपासून पुढील वेळापत्रकावर परिणाम होणार नाही, प्रवासाचा कालावधी तोच राहील, या दृष्टीने कोल्हापूर-मिरज मार्गावर गाडीचा वेग किंचित वाढवला जाण्याची शक्यता आहे.

अहमदाबाद-भुज दरम्यान नमो भारत रॅपिड रेल्वे सुरू झाली. या ट्रेनचा फायदा मध्यमवर्गीय लोकांना होणार आहे. नमो भारत रॅपिड रेल आगामी काळात देशातील अनेक शहरांना जोडणार आहे. नवी नमो भारत रॅपिड रेल्वे देशातील १५ हून अधिक मार्गांवर सुरू होणार आहे. आज १२५ हून अधिक वंदे भारत गाड्या देशातील लोकांना सेवा देत आहेत. हा भारताचा सुवर्णकाळ आहे. येत्या २५ वर्षात देशाचा विकास करायचा आहे.

उद्घाटनापूर्वी ट्रेनचे नाव बदलले

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देशातील पहिल्या वंदे मेट्रो ट्रेनला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. त्याआधी रेल्वेने आज मोठा निर्णय घेतला आहे. वंदे मेट्रोचे नामकरण नमो भारत रॅपिड रेल असे करण्यात आले आहे. देशातील पहिली नमो भारत रॅपिड रेल्वे भुज ते अहमदाबाद दरम्यान धावणार आहे. ही ट्रेन तिच्या नियमित कामकाजादरम्यान अहमदाबाद आणि भुज दरम्यान साबरमती, चांदलोडिया, सानंद, विरमगाम, समखियाली, गांधीधाम यासह १२ स्थानकांवर थांबण्याची शक्यता आहे. मात्र, येत्या एक-दोन दिवसांत ट्रेनच्या थांब्यांसह वेळापत्रकाबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

### दिल्लीच्या नव्या...

यासोबतच ते म्हणाले की सीएमची मंत्र्यांसोबत वन टू वन मीटिंग झाली. वन टू वन मीटिंगमागचे कारण हे की कोणालाही एकमेकांनी सुचवलेले नाव समजणार नाही.

मुख्यमंत्री केजरीवालांनी केली होती राजीनाम्याची घोषणा

मंगळवारी सकाळी साडे अकरा वाजता होईल.यात नव्या मुख्यमंत्रीपदाच्या नावावर चर्चा होईल. आबकारी निती प्रकरणात जामीनावर तिहार तुरुंगातून सुटका झाल्यानंतर आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी रविवारी घोषणा केली की ते ४८ तासांच्या आत राजीनामा देतील आणि दिल्लीत लवकर निवडणुकीची मागणी करतील.

### २५ सप्टेंबर...

यामुळे शाळांचा दर्जा घसरून त्या बंद पडण्याची भीती शिक्षक संघटनांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी यासंदर्भात माहिती दिली.

### भ्रष्ट पैशातून...

नवनाथ भोसले, तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सतिश अंबेकर, अध्यात्मिक आघाडीचे ज्ञानोबा भिसे, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, महिला आघाडी तालुकाध्यक्षा अनुसया फड, शिंदे सेनेचे जिल्हा युवाप्रमुख सरपंच कुलदिप सुर्यवंशी, सरपंच सुनिल चेवले, उपसरपंच डॉ. परमेश्वर जाधव, सुनिल सुर्यवंशी, श्रीमंत नागरगोजे, विठ्ठल कस्पटे, शिवमूर्ती ऊरगुंडे, नानासाहेब कसपटे, संगमेश्वर स्वामी, प्रताप भुरे, मधुकर भुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

सांगवी येथील जिप शाळेच्या ३६ लक्ष रुपये खर्चाच्या चार वर्गखोली बांधकामचा शुभारंभ, सिंधगाव येथे २० लक्ष रुपये खर्चाच्या जगदंबा देवी मंदिर समोर सभामंडप बांधकामचा आणि गावअंतर्गत सिमेंट रस्ता व नाली बांधकामचा शुभारंभ, आरजखेडा येथे अंगणवाडीचे लोकार्पण, निवाडा येथील संगमेश्वर मंदिर परिसरात १७ लक्ष रुपये खर्चाच्या किचनशेड व संरक्षण भिंतीचे उदघाटन, बौध्द विहार वास्तूचे लोकार्पण आणि शेरा येथील दावलमलिक बाबा दर्गाह येथे ५० लक्ष रुपये खर्चाच्या सभागृहाचे लोकार्पण भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले. निवाडा येथील खंडोबा मंदिर सभागृह करिता १० लक्ष रुपये निधीचे पत्र ग्रामस्थांना सुपूर्त केले. सांगवी येथ आणखी २ शाळा खोल्या व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी मिळवून दिला जाईल, सांगवी गावात येणाऱ्या रस्त्याचा प्रश्न लवकरच निकाली काढला जाईल, बस सेवा तात्काळ सुरू करण्यासाठी योग्य ती कारवाई करावी अशी सूचना परिवहन मंडळाच्या अधिकाऱ्यांना आ. कराड यांनी फोनवरून दिली. गव्हाण आरजखेडा रस्त्याचे काम प्राधान्याने सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले.

काँग्रेसला ६५ वर्षात जमले नाही ते गेल्या १० वर्षात मोदीजींनी जे करून दाखवले. गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक लोक कल्याणकारी योजना सुरू केल्या. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेची सविस्तर माहिती देवून या योजनेचा लाभ कोणाकोणाला मिळाला असा प्रश्न आ. कराड यांनी उपस्थित केला. काँग्रेसवाल्यांनी जे काही लाभ दिले ते तोंड बघून दिले, मात्र महायुती शासनाने जात, धर्म, पंथ असा कुठलाही भेदभाव न करता जो पात्र लाभार्थी आहे ज्याला गरज आहे अशा गरजवंतांना विविध योजनेचे लाभ मिळत आहेत असे बोलून दाखवले.

निवडून गेलेल्या आमदाराला सामान्य जनतेशी काहीही घेणेदेणे नाही. निष्क्रिय माणसाला संधी दिली हेच तुमचे दुर्दैव आहे. विकास कामासाठी निधी आणण्याचा प्रयत्न केला नाही, मात्र मी केलं मी केलं हे माझ्यामुळे झाले असे सांगून श्रेय लाटण्याचा केविलवाणी प्रयत्न सातत्याने केला जात असून काँग्रेस आमदारांनी पंधरा वर्षात काय केले. कुठल्या कामाला निधी दिला असा प्रश्न उपस्थित करून आमदार नसताना मी मतदारसंघातील प्रत्येक गावागावात विकासाला मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला. मला एकदा आमदार करा गावातील एकही विकासाचे काम शिल्लक राहणार नाही असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा महिलांना लाभ मिळू नये यासाठी काँग्रेसवाले न्यायालयात गेले, निवडून गेलेल्या आमदाराच्या मातोश्री वहिनीसाहेब आणि सौभाग्यवती लाडकी बहीण ही योजना फसवी आहे पैसे मिळणार नाहीत असे सांगून महिलांची दिशाभूल केली मात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा होताच यांचे तोंड बंद झाले.

साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्याची अडवणूक आणि पिळवणूक करणे हेच काँग्रेसवाल्याचे धोरण आहे. साखर कारखाने ही देशमुखची जहागिरी नाही तर शेतकरी सभासदाच्या मालकीचे आहेत. मांजराच्या दारात हजारो शेतकऱ्यांना सोबत घेऊन मी आंदोलन केले, म्हणूनच एफआरपीप्रमाणे भाव द्यावा लागला. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण या पुढील काळात चालू देणार नाही, मांजरा कारखान्याला पाचट कपातीचे प्रकरण अंगलट येणार हे लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांना पाचट कपातीचे पैसे देऊन उपकाराची भाषा केली जाते मात्र कपातच कुठल्या नियमात केली हे शेतकऱ्यांना जाहीरपणे सांगावे. मांजरा परिवारातील साखर कारखान्यापेक्षा इतर साखर कारखान्यांनी अधिकचा भाव दिला.

राज्यातील महायुती शासन देणारे आहे, या शासनाने अनेकांना आधार देण्याचे काम केले तर मागील महाविकास आघाडीचे शासन हे वसुली करणारे शासन होते या आघाडी सरकारच्या काळात अनेक मंत्री जेलमध्ये गेले. महायुती शासनाच्या लोककल्याणकारी विविध योजनेचा समाजातील सर्वच घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळत आहे या सर्व योजना भविष्यातही सुरू ठेवण्याकरिता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ द्यावी असेही आवाहन यावेळी आ. कराड यांनी केले.

संवाद कार्यक्रमास उपसरपंच भालचंद्र सूर्यवंशी, वाजिद पठाण सूर्यवंशी, राजाभाऊ सूर्यवंशी, दगडू सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी, हरिश्चंद्र सूर्यवंशी, महादेव सूर्यवंशी, दिलीप जाधव, दगडू सावंत, मेघराज जाधव, जयद्रथ सावंत, गुणवंत जोगदंड, बालाजी सावंत, कैलास सावंत, समाधान सावंत, गोविंद जाधव, अविष्कार मुळे, सोमनाथ जाधव, दत्तात्रय चेवले, विशाल चिलमे, मनोहर कुलकर्णी, बळवंत कुलकर्णी, गोवर्धन चेवले, डॉ.अशोक धोंडे, मदन हरेलकर, हनुमंत कुंभार, लक्ष्मण चेवले, महादाप्पा चिंचकर, सरपंच बेबीसरोजा भुरे, बापू कुलकर्णी, कल्याण भुरे, शेख चांदपाशा, माजी उपसरपंच महादेव कांबळे, ॲड शेख सिकंदर, कल्याण भुरे, गुलाब शेख, सरपंच वंदना साळुंखे, उपसरपंच महादेव कोंढुळे, सदाशिव राठोड, संजय पिंपळे, संगमेश्वर जमदरे, गफूर शेख, विजयकुमार उरगुंडे, रसूल शेख, किशोर कारणे, दयानंद लकडे, बाळू गिरी, राम गायकवाड, विलास कस्पटे, मेघराज बडे यांच्यासह गावातील नागरिक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

आत्मबोध १५

ज्यांच्याकडे नाही ज्ञान ।
केवळ अज्ञानाची खाण ।
त्यांचे दूर व्हावे अज्ञान ।
चित्त शुद्धी करावी ।। १ ।।

चित्त शुद्धीसाठी ।
ज्ञानाची धरावी काठी ।
निष्काम कर्म त्यासाठी ।
करावे लागती ।। २ ।।

चित्तशुद्धीने मिळे ज्ञान ।
त्याने होई समाधान ।
होई तो सावधान ।
जीवनात ।। ३ ।।

करावे निष्काम कर्म ।
हाचि खरा धर्म ।
जीवनाचे हेच मर्म ।
समजून घेऊ ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
३०/०१/२०२२

# हैदराबाद मुक्ती संग्रामात महिलांचे योगदान

हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्त्वपूर्ण, रोमांचकारी असा लढा आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांची जुलुमी सत्ता उलथवून टाकूनही भारतीय स्वातंत्र्याला भौगोलिक सलगता प्राप्त झाली नव्हती. हैदराबाद संस्थानातील जनता असफजाही घराण्याच्या निजामी सत्तेच्या राजवटीखाली भरडली जात होती. हैदराबाद संस्थान सरंजामी व मध्ययुगीन रूढीचा वारसा बाळगून असणारे संस्थान होते .इसवी सन १७२४ ते १९४८ असे जवळपास सव्वा दोनशे वर्ष संस्थानातील जनता गुलामांची गुलाम होती. निजाम मीर उस्मान अली हा अनियंत्रित सत्तेचा भोक्ता होता. त्यातच कासिम रझवीसारख्या अतिरेकी विचाराने भारावलेल्या नेत्याच्या उदयाने संस्थानातील जनतेचे जीवन दोलायमान झाले होते. अनन्वित छळ, अन्याय, अत्याचार स्वातंत्र्यावर बंदी, जुलूम जबरदस्ती वाढत गेली. परिणामी निजामी सत्तेच्या विरोधात संघर्षाचा वणवा पेटला. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, क्षेत्रातील गुलामगिरीला झुगारून देण्यासाठी जनतेचा एक लढा उभा राहिला. हैदराबाद संस्थानाच्या लढ्यात अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक परिषदा आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र प्रांतीय परिषदा, वंदे मातरम चळवळ, आर्य समाज, हैदराबाद स्टेट काँग्रेस, स्वामी रामानंद तीर्थ यांचे प्रेरणादायी नेतृत्व, स्वामीजी यांचे अनेक निष्ठावंत सहकारी, शूरवीर, हुतात्मे, भूमिगत कार्यकर्ते, शेतकरी, मजूर, विद्यार्थी, महिला, तरुणांनी केलेल्या अतुलनीय कार्यातून या उत्स्फूर्त लढ्याची परिणीती पाहायला मिळते. हैदराबाद मुक्ती लढा केवळ हैदराबाद संस्थानातील जनतेसाठीचा महत्त्वाचा लढा नाही तर अखंड, धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी राष्ट्र अस्तित्वात आणण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असा लढा आहे. अशा भारताच्या सलग अखंड स्वातंत्र्यासाठी देण्यात आलेला लढा होता. या लढ्यात महिलांचे योगदान देखील अतुलनीय असे होते. सनातनी रूढी, प्रथा, परंपरा ,अन्याय, अत्याचार अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून निजामी राजवटी विरोधात महिलावर्गाने सक्रिय सहभाग नोंदवला.

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील महिलांचे योगदान हे अखिल भारतीय, महाराष्ट्र पातळीवरील स्वातंत्र्य चळवळ समाज व धर्म सुधारणा चळवळीतील महिलांच्या योगदाना इतकेच गुणात्मक दृष्ट्या महत्त्वपूर्ण राहिले होते. दगडाबाई शेळके, आशाताई वाघमारे, सुशीला ताई दिवाण, राजकुंवर काबरा, कुसुमताई जोशी, शांताबाई कोटेचा, प्रमिला कुलकर्णी, लक्ष्मीबाई मयेकर अशा अनेक महिलांनी मुक्ती लढ्यात सक्रिय सहभाग घेतला.

गोदावरीबाई टेके: भारतातील स्त्री ही अबला नसून सबला आहे. हे गोदावरी बाई टेके यांनी दाखवून दिले. पती किसनराव टेके हे रझाकारांशी सशस्त्र मुकाबला करणारे आर्य समाजाचे कार्यकर्ते होते .रझाकारांनी टेके यांच्या वाड्यावर हल्ला केला असता गोदावरी बाई टेके यांनी रझाकारांवर गोळ्या झाडल्या. रझाकारांनी टेके यांच्या वाड्याला आग लावली तेव्हा शेवटच्या क्षणापर्यंत गोदावरीबाई टेके यांनी रझाकारांबरोबर झुंज दिली व शेवटी अग्नी प्रवेश करून हौतात्म्य पत्करले.

सशस्त्र क्रांतिकारी दगडाबाई शेळके मराठवाडा मुक्ती लढ्यातील शूरवीर महिला म्हणजे दगडाबाई शेळके या प्रत्यक्ष तलवार हातात घेऊन निजामी सत्तेशी अतिरेकी रझाकारांबरोबर लढल्या. रेल्वेचे रूळ उखडणे, पोलीस चौकी, शासकीय दप्तरे जाळणे, रझाकारांच्या छावणीवर बॉम्ब हल्ले करणे अशा स्वरूपाची कामे जीवावर उदार होऊन दगडाबाई शेळके करत असत. स्वातंत्र्यसैनिक म्हणून दगडाबाईंना सर्वत्र मान्यता होती. औरंगाबाद येथील क्रांती चौकातील झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याचे अनावरणही दगडाबाई शेळके यांच्या हस्ते झाले. एका क्रांतीज्योतीने दुसऱ्या क्रांतीज्योतीला दिलेला मानाचा हा मुजरा होता.

आशाताई वाघमारे:

मराठवाडा मुक्तीलढ्यात निजामी सत्तेविरुद्धच्या संघर्षाची बीजे जनमानसात समर्थपणे रुजविण्याचे कार्य आशाताईंनी केले. मराठवाडा मुक्तीलढ्यात महाराष्ट्र परिषदेचे अतुलनीय योगदान आहे. महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनातील महिला अधिवेशन यात आशाताईंचा सहभाग होता. तसेच औरंगाबाद येथील अधिवेशनाची संपूर्ण जबाबदारी आशाताईंनी सांभाळली होती. तुरुंगात गेलेल्या कार्यकर्त्यांची घरे सांभाळणे, शस्त्रास्त्रांची देवाण-घेवाण करणे, वेष पलटून महत्त्वपूर्ण निरोप देणे तुरुंगातील नेत्यांना जेवण देणे अशी जोखीमची कामे आशाताईंनी केली. चळवळीमध्ये सक्रिय सहभाग असल्यामुळेच आशाताईंना निजाम राजवटीत चार महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगातही आशाताईंनी कैद्यांसाठी साक्षरतेचे वर्ग सुरू केले. एकंदरीतच चळवळीमध्ये समर्पित असलेल्या अनेक मुलांच्या त्या आई होत्या.

सुशीलाताई दिवाण:

मराठवाडा मुक्ती लढ्यात लोकजागृती, संघटन, कुशल नेतृत्वाची निर्मिती, लोकलढ्याचे स्वरूप, सामाजिक प्रश्नांचा उहापोह, मातृभाषेचा स्वीकार, लेव्ही प्रश्न, जबाबदार राज्यपद्धती, अनियंत्रित राज्य सत्तेचा विरोध असे अनेक प्रश्न महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठावर मांडले जात होते. महाराष्ट्र परिषदेच्या सन १९३८ मध्ये लातूर येथे झालेल्या अधिवेशनाला जोडून महिला अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाची जबाबदारी सुशीलाताई दिवाण यांनी तन्मयतेने सांभाळली. मुलींचे दहावीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे. मुलींच्या शाळा स्थापनेस कोणतीही अट असू नये, असे महत्त्वपूर्ण ठराव त्यांनी या अधिवेशनात मांडले. महाराष्ट्र परिषदेच्या सेलू येथील अधिवेशनात महिला संमेलन सुशीला ताई दिवाण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या अधिवेशनात महिलाविषयक महत्त्वपूर्ण ठराव संमत झाले. एकूणच महाराष्ट्र परिषदेच्या कार्यात महिलांचा सहभाग वाढविणे, महिलांचे संघटन, परिषदेसाठी निधी जमा करणे, असे मोलाचे योगदान सुशीला ताई दिवाण यांचे होते. राजकुंवर काबरा

राजकुमार काबरा या राष्ट्र सेवा दलाच्या शाखेत नाशिक येथे महिला विभागाच्या प्रमुख व नंतर जिल्हाप्रमुख म्हणून कार्य करत असत. हैदराबादला असताना संग्रामाबद्दल जागृती व्हावी म्हणून इंफ्रीडम क्लबफ आयोजित केले. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात राजकुंवरबाई उपस्थित राहत असत. लातूर येथील महिला अधिवेशनात राजकुंवरबाई या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. १९४७ साली हैदराबाद येथे स्टेट काँग्रेसचे अधिवेशन तीन दिवस होते. त्यावेळी महिला स्वयंसेवक म्हणून दलाच्या एका तुकडीच्या प्रमुख राजकुंरबाई यांनी कार्य केले.

कुसुमताई जोशी: निजामी राजवटीच्या काळातील नाट्यसृष्टीतील उल्लेखनीय कर्तृत्व गाजवणाऱ्या कुसुमताई जोशी यांनी मुक्ती संग्रामात भरीव योगदान दिले आहे. मुक्तिसंग्रामाविषयी माहिती देणे जागृती करणे त्यासाठी मुद्रित प्रसार माध्यमांचा वापर होत असत. या काळात ही प्रभावी प्रसार माध्यमे होती. कुसुमताईच्या घरात हॅण्ड प्रेस असावी व ती चालवण्याची जबाबदारी त्यांनी घ्यावी असे मुक्तिसंग्रामातील नेत्यांना वाटत. त्यानुसार कुसुमताईंनी ही जबाबदारी घेतली रात्री दीड दोन वाजेपर्यंत छपाईचे काम चालत असे. छापील पत्रके रात्रीच मंदिरात नेऊन दिले जात असत. या पत्रकाद्वारे जनतेचे मनोबल वाढवणे, महिला संघटित करणे, पैसा जमा करणे, मुक्तिसंग्रामाची भूमिका समजून सांगणे हे कार्य करत असत माणिकचंद पहाडे, द्वारकादास पाटील, भीमराव कुलकर्णी, काशिनाथ नावंदर अशा अनेक भूमिगत मंडळींनी कुसुमताईच्या घरी आश्रय घेतला.

गिताबाई चारठाणकर:

शस्त्रांचा पुरवठा कार्यकर्त्यांना करणे व कार्यकर्त्यांना आश्रय देणे हे धाडसाचे कार्य गिताबाई करत. शस्त्रे ने -आण करत असताना मनमाड स्टेशनवर त्यांना अटक झाली. पुढे खटला कोर्टात दाखल झाला. माणिकचंद पहाडे, श्रीनिवास बोरकर यांनी जामीन देऊन त्यांची सुटका केली. ब्रिटिश भारतातून हैदराबाद संस्थानातून शस्त्र आणण्याचे शौर्याचे काम त्यांनी केले. मुक्तिसंग्रामात गिताबाईचे मोलाचे योगदान होते. शकुंतलाबाई साले: हैदराबाद संस्थानातील नांदेड शहरात शकुंतलाबाई साले, सरस्वतीबाई सरदेशपांडे, कावेरीबाई बोधनकर या स्त्रियाचे कार्य उल्लेखनीय होते. ९ ऑगस्ट १९४७ च्या झेंडा प्रकरणात शकुंतलाबाई साले यांनी महिला आघाडी समर्थपणे सांभाळली. नांदेड मधील या महिला कार्यकर्त्यांनी मुलींसाठी शाळा वसतिगृह सुरू करण्यास पुढाकार घेतला. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाची सोय केली. मराठवाड्यातील जनतेला निजामशाहीच्या जोखडातून कायमचे मुक्त करायचे असा निर्धार त्यांनी केला होता.

ताराबाई परांजपे:

मुक्ती संग्रामात अनेक लढवय्या तरुणांप्रमाणे तरुणी होत्या. ताराबाई यांनी देश प्रेमाने भारावून जाऊन या लढ्यात अनेक जखमीचे कामे यशस्वीपणे पार पाडली. निजामाविरोधी प्रचार करणे, निधी जमा करणे, सत्याग्रहींना सत्याग्रहाच्या निश्चित ठिकाणी पोहोचविणे. आपण गरोदर असल्याचे भासवून पोटाला पत्रके बांधून ती सत्याग्रहाच्या ठिकाणी पोचती करणे अशी धाडसाची कामे हैदराबादमध्ये ताराबाईंनी केली. हैदराबाद मध्ये निजाम कॉलेज पासून ते आर्य समाज मंदिरापर्यंत विद्यार्थ्यांचा मोर्चा येणार होता. याच मार्गावर विवेकवर्धिनी कन्या शाळा होती. या शाळेतील ५०-६० विद्यार्थ्यांनी भाऊसाहेब वैशंपायन व ताराबाईच्या सल्ल्याने शामिल झाल्या.

हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये ज्ञात अज्ञात अनेक महिलांनी सहभाग घेतला. मुक्तिसंग्रामात वरील सर्व महिलांच्या प्रेरणा घेऊन घराघरातील भगिनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी झालेल्या होत्या. यात सीताबाई नांदापूरकर, करुणाबाई चौधरी, शांताबाई देशपांडे, गंगुबाई देव, चंदाबाई जरीवाला, चंदाबाई जोशी, रुक्मिणीबाई विठ्ठल कोरडे, कोतलेबाई, प्रमिलाबाई कुलकर्णी, सुनंदाबाई जोशी प्रमिलाताई महेंद्र, पानकुंवर फिरोदिया, रुक्मिणीबाई काळोजी, इंदिराबाई शर्मा, लक्ष्मीबाई पटणीटकर, कमला किर्लोस्कर, शैलजा गोगटे, लताबाई डोईफोडे, रमाबाई रांजवे, इंदुबाई सोनोदे अशा असंख्य महिलांनी योगदान दिले. तत्कालीन रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती, विधी विधानांची सर्व बंधने झुगारून देऊन पुरुषांच्या बरोबरीने मुक्ती संग्रामात महिलांनी योगदान दिले. घराघरातील महिलांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या सहभागी होऊन संघटनात्मक काम केले स्वाभिमानी, राष्ट्राभिमानी महिलांनी समर्पित वृत्तीने आपले जीवन जगले. त्यांच्या या अतुलनीय योगदानामुळे, त्यांनी पत्करलेल्या हौतात्म्यामुळे एकसंघ भारत निर्माण झाला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाची जुलमी राजवट संपुष्टात येऊन हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी संस्थानातील जनतेने सत्याग्रहापासून सशस्त्र लढापर्यंत अविरत संघर्ष केला .जनतेने दिलेला हा उत्स्फूर्त लढा होता. देशप्रेम, समर्पण या भावनेतून दिलेला हा लढा अद्वितीय स्वरूपाचा होता आणि त्यात महिलांचे योगदान उल्लेखनीय व अतुलनीय असेच होते. कधी न थांबलो विश्रांती स्तव पाहिले न मागे बांधू न शकलो प्रीती वा कीर्तीचे धागे असे जगतहैदराबाद मुक्तिसंग्राम व भारतीय स्वातंत्र लढ्यात पदोपदी पसरून निखारे आपल्याच हाती होऊन बेहोश धावलो ध्येय पथावरती स्वातंत्र्याच्या ध्येयपथावर बेहोष होऊन मुक्तिसंग्रामात व स्वातंत्र्यलढ्यात ज्या ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र सैनिकांनी आपल्या प्राण्यांची आहुती दिली. त्या सर्व थोर हुतात्म्यांना आजच्या १७ सप्टेंबर मराठवाडा / हैदराबाद संग्राम दिनी विनम्रतापूर्वक अभिवादन.



- प्रा. डॉ. अश्विनी सोमनाथ रोडे,
इतिहास विभाग,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर.
मो. ९०२१०२८७९९

# बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर शाळेमध्ये इको फ्रेंडली पद्धतीने श्री गणेश विसर्जन मोठ्या भक्ती भावाने संपन्न



उदगीर : गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर शाळेमध्ये गणेश चतुर्थी निमित्त दि. ०७ सप्टें. २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब राठोड यांच्या हस्ते गणपतीची विधिवत स्थापना करण्यात आली होती. यानिमित्त शाळेमध्ये सात दिवस बाप्पाची उत्साहात रोज विधीवत पूजा करून विद्यार्थ्यांना पौष्टिक प्रसादाचे वाटप करण्यात आले. शाळेतील श्री गणेश उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणाला अनुकूल व नुकसान न पोहोचता हा गणेशोत्सव साजरा करण्यात आला तसेच पर्यावरणाच्या संवर्धना बाबत जनजागृती करण्यात आली.

संस्थेचे सचिव अमित राठोड यांच्या संकल्पनेतून पर्यावणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच नदी-नाले , विहिरी व तलावात होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरिता बिर्ला ओपन माईडस इंटरनॅशनल स्कूल शाळेमध्ये शांततेत, फुलांची उधळण करीत गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात ईको फ्रेंडली पद्धतीने अत्यंत भक्ती भावाने प्रसन्न वातावरणात श्री गणेशाचे विसर्जन करण्यात आले.

विसर्जन मिरवणुकीत साऊंड किंवा डीजे न वापरता शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या झाँज पथक व पारंपरिक ढोल वाद्याच्या गजरात उपस्थितानी चांगलाच ठेका धरला त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत चांगलाच रंग भरला होता. शाळेच्या परिसरात गणपती विसर्जनासाठी कृत्रिम हौद बांधण्यात आले होते व त्या हौदातच श्री. गणेशाचे विसर्जन करण्यात आले त्यामुळे नदी-नाले, विहिरी व तलावात होणारे प्रदूषण टाळण्यात आले.

याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ.ज्योती राठोड, सचिव अमित राठोड, शाळेचे प्राचार्य ऋत्विक भट्टाचार्य, शालेय विभाग प्रमुख सचिन साळुंके उपस्थित होते. श्रीगणेश उत्सव व विसर्जन हे उत्साहात पार पाडण्यासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख स्वाती भांगे, सविता कोडगे, क्रीडा विभाग प्रमुख अर्शद खान तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गणपती बाप्पा मोरया जयघोषात नाथ संस्थानात गणेश याग संपन्न

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- श्री सद्गुरु विरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान श्रीक्षेत्र औसा यांच्या नाथ सभागृहात सोमवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात व श्री व सौ.श्रीरंग महाराज औसेकर यांच्या हस्ते पूर्णाहुती होऊन गणेश यज्ञाची विधिवत मंत्रघोषात हजारो गणेश भक्तांच्या उपस्थितीत भक्ति उत्साहात सांगता झाली. दरवर्षी म्हणजे आज पासून ३५ वर्षांपूर्वी सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज यांनी नाथ मंदिरात द्वितीय सत्पुरुष सद्गुरु मल्लाप्पा महाराज यांनी स्थापित केलेल्या श्री सिद्धिविनायक गणेशाच्या समोर सलग दहा दिवस गणेशोत्सवात अथर्वशीर्षाचे जवळपास १८००० पाठ करून या अथर्वशीर्ष पाठा चे हवन यज्ञाद्वारे करण्यात आले. निलंगा येथील वेदशास्त्र संपन्न श्री माधव महाराज पिंपळे यांच्या मुख्य पौरहित्यात व त्यांचे चिरंजीव श्रीपाद महाराज तसेच श्री. बबनदेव जोशी. श्री. कौंडिन्य महाजन, श्री राहुल कुलकर्णी, श्री



छोटू देव, बालाजी देव, श्री पाठक व अन्य ब्रह्मवृंदाच्या मंत्रघोषात यज्ञ नारायणाचे विधिवत पुजन, आणि यज्ञ आहोती करण्यात आली.

